दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-९२ | सोमवार दि.२२ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### श्रद्धेचा मुखवटा आणि अंधश्रद्धेचे साम्राज्य

पुण्यात उघडकीस आलेले कथित ''दैवी अवतार'' प्रकरण हे केवळ एका स्वयंघोषित गुरूविरोधातील गुन्हेगारी आरोपांचे प्रकरण नाही; ते भारतीय समाजातील अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा आणि विवेकशून्य भक्तीच्या धोकादायक वास्तवाचे प्रतिबिंब आहे. एका उच्चशिक्षित महिलेने केलेल्या गंभीर आरोपांमुळे या प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडवली असून, आता त्याला महत्त्वाचे कायदेशीर वळण मिळाले आहे.

# पावसाळी अधिवेशनात महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा

## ● ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफिचा लाभ; मुख्यमंत्र्यांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन रविवार, २२ जूनपासून सुरू होत असून, या अधिवेशनात राज्य सरकार दहा महत्त्वाची विधेयके मांडणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी कर्जमाफी, पावसाची स्थिती आणि शेतीविषयक उपाययोजनांबाबत सविस्तर भूमिका मांडली. मुख्यमंत्री म्हणाले की, यंदाच्या अधिवेशनात महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देणारे महत्त्वपूर्ण विधेयक सादर करण्यात येणार आहे. महिलांच्या शेतीतील योगदानाची दखल घेत त्यांना अधिकृत ओळख मिळवून देण्यासाठी हा निर्णय घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले.**



शेतकरी कर्जमाफीबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, ही कर्जमाफी कोणत्याही निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेली नसून शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेला निर्णय आहे. ''निवडणुका नसतानाही आम्ही कर्जमाफी केली आहे. कर्जमाफी हा आमच्यासाठी राजकीय विषय नाही. शेतकरी जगला पाहिजे, सक्षम झाला पाहिजे यासाठी हा उपक्रम आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी योजना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची असून त्याचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. बहुतांश पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी दोन लाख रुपये जमा करण्यात येणार असून याबाबतची सविस्तर आकडेवारी अधिवेशनात सादर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. बँकिंग व्यवस्थेवर ताण पडू नये यासाठी काही निकष निश्चित करण्यात आले आहेत. नागपूर, वर्धा, बुलढाणा यांसारख्या भागांतील काही बँका अडचणीत आल्याने शेतकऱ्यांना कर्जपुरवठ्यावर परिणाम झाला असल्याचे नमूद करत, ''ही कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी आहे, बँकांसाठी नाही,'' असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर ▶▶ पान २ वर

# ५६ टक्के कमिशन घेणारे सरकार

## महाविकास आघाडीची पत्रकार परिषद, चहापानावर बहिष्कार

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारच्या अपयशी कारभाराविरोधात आणि जनतेच्या प्रश्नांबाबत सरकारच्या असंवेदनशील भूमिकेचा निषेध म्हणून महाविकास आघाडीने विधानमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्याची घोषणा रविवारी पत्रकार परिषद घेत केली.**



महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी राज्यातील गंभीर प्रश्नांकडे सरकारचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. राज्यात दुष्काळ,शेतकरी प्रश्न, महिलांवरील वाढते अत्याचार, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था, वाढते अमली पदार्थांचे जाळे यांसारख्या अनेक प्रश्नांवर सरकारकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याची टीका महाविकास आघाडीने केली. राज्यावर दुष्काळाचे संकट आहे. पेरण्या लांबल्या आहेत, शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहे. सरकारने सुका दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेनेचे गटनेते भास्कर जाधव यांनी पत्रकार परिषदेत केली. सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यात शेतकऱ्यांना अटी शर्तीमध्ये अडकवण्यात आले आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करावा अशी मागणी महाविकास आघाडीने यावेळी केली. विधान परिषदेचे काँग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी, हे सरकार ५६ टक्के कमिशन सरकार असल्याची टीका केली. राज्यात ▶▶ पान २ वर

# ओमराजेंचे ठरले, शिंदेंच्या शिवसेनेचा भगवा हाती घेणार

## भेटीसाठी तानाजी सावंत दाखल



धाराशिव। प्रतिनिधी

मी माझ्या कार्यकर्त्यांशी चर्चा करुनच माझा राजकीय निर्णय घेणार असल्याची भूमिका खासदार ओमराजे निंबाळकर यांनी मांडली होती. त्यानंतर, रविवारी त्यांनी आपल्या धाराशिवमधील गोवर्धनवाडी येथील गावात त्यांनी मतदारसंघातील सर्वच तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना बोलावले होते, या कार्यकर्त्यांशी ओमराजेंनी बंद दाराआड चर्चा केली असून ओमराजेंनी ▶▶ पान २ वर

### " ओमराजे निंबाळकरांचा थेट उद्धव ठाकरेंना फोन

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यात फोनवरून संवाद झाल्याची माहिती समोर आली आहे. उद्धव ठाकरे यांनी ओमराजे निंबाळकरांची भूमिका जाणून घेतली, ओमराजे यांचे नेमके म्हणणे काय आहे, हे उद्धव ठाकरेंनी समजून घेतले. आपण पक्षासोबत आहोत, आपण कुठलाही निर्णय घेतला नाही, असे ओम राजे यांनी उद्धव ठाकरेंना सांगितले. आपणच मला मोठें केले आहे, आज मी खासदार आहे ते पक्षामुळे आणि तुमच्यामुळे; त्यामुळे मी कुठलाही निर्णय घेतला नाही. मी कार्यकर्त्यांसोबत सगळ्या बाबतीत चर्चा करणार आहे, असे ओमराजे निंबाळकर यांनी उद्धव ठाकरेंना सांगितल्याची माहिती समोर आली आहे.

# वाहन चोरीचा विमा क्लेम फायनान्सरला मिळणार नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

दिल्ली । वृत्तसंस्था

विमाधारक मालकाने वाहन खरेदीसाठी वित्तपुरवठा करणाऱ्या व्यक्तीकडे (फायनान्सरकडे) केवळ वाहन सुपूर्द करणे हे, वाहन चोरीला गेल्यास किंवा त्याचे नुकसान झाल्यास नुकसानभरपाईचा दावा करण्यासाठी फायनान्सरसाठी पुरेसे ठरणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने दिला आहे. या प्रकरणी खंडपीठाने राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाच्या निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे.




के. प्रकाशचंद यांनी सोमशेखर नावाच्या व्यक्तीला गाडी खरेदी करण्यासाठी कर्ज दिले होते. कर्जदाराने आर्थिक अडचणींमुळे डिसेंबर २००३ मध्ये गाडी फायनान्सरकडे सुपूर्द केली होती. ही गाडी फायनान्सरच्या ताब्यात असतानाच चोरीला गेली. पोलिसांना गाडी शोधण्यात अपयश आल्यानंतर त्यांनी तपास बंद केल्याचा अहवाल दिला. यानंतर फायनान्सरने विम्याच्या क्लेमसाठी अर्ज केला. मात्र, विमा कंपनीने हा क्लेम नाकारला, ज्यावरून हा वाद ग्राहक न्यायालयात पोहोचला. विमा कंपनीने क्लेम नाकारताना सांगितले की, वाहन मालक आणि कंपनी यांच्यात झालेल्या करारात फायनान्सर कुठेही भागीदार नव्हता. ▶▶ पान २ वर

# गेवराई वाळू घोटाळा: तहसीलदाराला वाचवण्याचा प्रयत्न?

## नाना पटोले, विजयसिंह पंडित प्रकरण विधानसभेत मांडणार

गेवराई -बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातून झालेल्या बेसुमार वाळू उपशाचे प्रकरण सध्या चांगलेच तापले आहे. राज्य शासनाने घरकुल लाभार्थ्यांसाठी जाहीर केलेली पाच ब्रास मोफत वाळू योजना गेवराई तहसीलदारांनी धाब्यावर बसवून, ही वाळू परस्पर ९० कोटी रुपयांना विकल्याचा धक्कादायक आरोप करण्यात येत आहे. या गंभीर प्रकरणात विद्यमान आमदारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतल्यानंतर १२ जणांवर गुन्हे दाखल झाले असले, तरी मुख्य




सूत्रधार असलेल्या तहसीलदारावर कोणतीही कारवाई न झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, हे प्रकरण काँग्रेसचे नेते नाना पटोले, आणि विजयसिंह पंडित अधिवेशना दरम्यान विधानसभेत ▶▶ पान २ वर

### प्रशासकीय वर्तुळात खळबळ

केवळ तहसीलदारावरच नव्हे, तर या भ्रष्टाचाराकडे डोळेझाक करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांवरही कारवाई होणार का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. उच्चस्तरीय चौकशीच्या मागणीमुळे गेवराईच्या महसूल विभागात खळबळ उडाली असून, राज्य शासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आजपासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन



मुंबई । प्रतिनिधी

सोमवार दि.२२ जून पासून राज्याच्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. पावसाने दडी मारल्याने राज्यात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, तीव्र पाणीटंचाई, शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी, ▶▶ पान २ वर

# मान्सून सक्रिय : कोकण, मध्य महाराष्ट्राला मुसळधारेचा इशारा!



पुणे । प्रतिनिधी

**तब्बल १६ दिवस अडखळलेला पाऊस रविवारी (दि. २० जून) सक्रिय झाला. रविवारी राज्यातील बहुतांश भागात हलका ते मध्यम पावसाने हजेरी लावली. त्यामुळे २२ ते २७ जूनदरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बारामती-सोलापूरजवळ अडखळलेला मान्सून २३ जून रोजी पुण्यात येण्याची शक्यता आहे.**

राज्यात ५ जून रोजी मान्सून सिंधुदुर्ग जिल्ह्यात दाखल झाला. नंतर ६ ते ७ जूनदरम्यान प्रगती करीत सोलापूर, हरणाई ते बारामती मार्गावर आला. मात्र, ६ ते २१ जून अशी १५ ते १६ दिवस पावसाने दडी मारली होती. यादरम्यान नागरिकांना असह्य उकाड्याने हैराण केले होते. अखेर २० जून रोजी राज्यात मान्सून सक्रिय झाला. रविवारी पुणे शहर परिसर आणि राज्यातील काही भागांत मान्सूनपूर्व सरी बरसल्या. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, मान्सून सोलापूर भागातून १५ दिवसांनंतर प्रस्थान करीत २३ जूनदरम्यान पुण्यात येत आहे. तो जोरदार सक्रिय होणार असल्याने २२ ते २७ जून दरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्रात मुसळधार; ▶▶ पान २ वर

# आजारांना दूर ठेवण्यासाठी योग हा रामबाण उपाय

## १२ व्या जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन

मुंबई । प्रतिनिधी

**जीवनशैलीमध्ये झालेल्या बदलांमुळे सध्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. या आजारांना दूर ठेवण्यासाठी योग हा रामबाण उपाय आहे. त्यामुळे नियमित योग करून जीवनशैलीविषयक आजारांना दूर ठेवले पाहिजे, अशा शब्दांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित केले.**

जुहू बीचवरील फूड कोर्ट जवळ आयोजित १२ व्या जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी




व्यासपीठावर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, शिवप्रकाश, केशव उपाध्ये, पवन त्रिपाठी, दीप्ती वायकर, उषा बेन आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सातत्याने योग करणारा व्यक्ती हा कुठल्याही मानसिक परिस्थितीमध्ये असली तरी आलेल्या आव्हानांचा यशस्वीपणे सामना करू शकतो. त्यामुळे योग विद्येचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. नियमितपणे योग करून आपण आपले शरीर निरोगी व मन प्रसन्न ठेवूया, असे आवाहनही यावेळी केले. पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जगभरात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्र संघामध्ये भारताने मांडला. संयुक्त राष्ट्र संघाच्या इतिहासात सर्वात कमी कालावधीत आणि कुठलाही विरोध न होता मंजूर झालेला हा प्रस्ताव आहे. भारताने दिलेल्या प्रस्तावानुसार आज जगभरात योग होत आहेत. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व जगाला पटले आहे. विश्वामध्ये योग विद्या आणि योग चिकित्सेबदल मोठे कुतूहल निर्माण झाले असल्याचेही यावेळी सांगितले. व्यक्ती ही केवळ शरीर नसून मन आणि आत्मा सुद्धा असल्याचे अधोरेखित करीत मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले, माणसाचे मन निसर्गाशी जुळलेले आहे. त्यामुळेच योग विद्येमध्ये केवळ शरीराचा विचार न करता मन, ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### १०७ खत विक्री केंद्रांचे परवाने निलंबित

पुणे: शेतकऱ्यांना दर्जेदार आणि रास्त दरात खतांचा पुरवठा व्हावा यासाठी कृषी विभागामार्फत पुणे विभागातील पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये खत विक्री केंद्राची कडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. एप्रिल २०२६ पर्यंत विभागात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली असून, आतापर्यंत १०७ खत विक्री परवाने निलंबित आणि ६ खत विक्री परवाने रद्द, तर ७ केंद्रांवर गुन्हे दाखल केले आहेत, अशी माहिती पुणे विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी दिली आहे. या मोहिमेअंतर्गत पुणे विभागात एकूण २ हजार ५७६ परवानाधारक केंद्रांची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान २८१ प्रकरणांमध्ये काळा बाजार झाल्याचे समोर आले असून, २७७ केंद्रांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. २७ परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

### तामिळनाडूत गॅस गळती; ७ महिला कामगारांचा मृत्यू

चेन्नई: तामिळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यातील फूड प्रोसेसिंग युनिटमध्ये (मत्स्य प्रक्रिया केंद्र) अमोनिया वायूची मोठी गळती झाली आहे. या अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायक घटनेत ७ महिला कामगारांचा मृत्यू झाला असून, अनेक कामगारांची प्रकृती अद्यापही गंभीर आहे. प्राथमिक माहितीनुसार, किमान ६७ कामगारांवर वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरू असून, यातील ७ जणांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले आहे. ही दुर्घटना पेरियापालयम जवळील कन्निगापैर गावात असलेल्या सेंट पीटर्स अँड पॉल सीफूड्स एक्स्पोर्ट्स कारखान्यात घडली. गॅस गळती झाल्यानंतर कारखाना परिसरात एकच खळबळ उडाली आणि बाधित कर्मचाऱ्यांना तातडीने रुग्णवाहिकेच्या सहाय्याने रुग्णालयात हलवण्यात आले.या अपघाताचा बळी ठरलेले बहुतांश कामगार हे उत्तर भारतातील विविध राज्यांमधून आलेले स्थलांतरित मजूर असल्याचे सांगण्यात येत आहे.

### प्रधान यांचा राजीनामा मिळेपर्यंत हटणार नाही

दिल्ली: नीट परिक्षेतील पेपरफुटी प्रकरणी जोपर्यंत क्रेंदीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत तोपर्यंत ते जंतर-मंतरवरून हटणार नाहीत, अशी ठाम भूमिका सीजीपीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी घेतली. या परीक्षांमधील कथित अनियमितता, वारंवार होणारी प्रश्नपत्रिका फुटण्याची प्रकरणे आणि सरकारकडून उत्तरदायित्वाची मागणी या मुद्द्यांवर कॉकरोच जनता पार्टीने आयोजित केलेल्या दुसऱ्या आंदोलनादरम्यान तेथे जमलेल्या मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि समर्थकांना ते संबोधित करत होते. नीट पेपरफुटीच्या विरोधात कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) चे जंतर-मंतरवर रविवारी दुसऱ्या दिवशीही आंदोलन सुरू होते. आंदोलक शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी रात्रभर जंतर-मंतरवर बसून होते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४७.५० क्विंटल | २,३०० | २,५५१ | २,३७७ |
| ज्वारी/हायब्रिड : ४४.०० क्विंटल | २,००१ | ३,२९१ | २,५२७ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : ९.५० क्विंटल | ७,४१५ | ७,४१५ | ७,४१५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,४०२ | २,७९६ | २,५९३ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ४,३०१ | ५,४५० | ५,१०२ |

अग्रलेख

# श्रद्धेचा मुखवटा आणि अंधश्रद्धेचे साम्राज्य

पुण्यात उघडकीस आलेले कथित ''दैवी अवतार'' प्रकरण हे केवळ एका स्वयंघोषित गुरूविरोधातील गुन्हेगारी आरोपांचे प्रकरण नाही; ते भारतीय समाजातील अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा आणि विवेकशून्य भक्तीच्या धोकादायक वास्तवाचे प्रतिबिंब आहे. एका उच्चशिक्षित महिलेने केलेल्या गंभीर आरोपांमुळे या प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडवली असून, आता त्याला महत्त्वाचे कायदेशीर वळण मिळाले आहे.

राधामोहन मिश्रा या स्वयंघोषित गुरूवर एका महिलेच्या लैंगिक, मानसिक आणि शारीरिक शोषणाचे आरोप करण्यात आले आहेत. पीडितेच्या तक्रारीनुसार तिला धमक्या देण्यात आल्या, विजेचे धक्के देण्यात आले, मेणबत्त्यांनी भाजण्यात आले आणि तिच्यावर विविध प्रकारचे अत्याचार करण्यात आले. याहून अधिक धक्कादायक बाब म्हणजे, या कथित अत्याचारांना ''प्रसाद'' म्हणून स्वीकारण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. जर हे आरोप न्यायालयात सिद्ध झाले, तर तो केवळ एका व्यक्तीचा गुन्हा ठरणार नाही; तर श्रद्धेच्या नावाखाली मानवी स्वातंत्र्य आणि सन्मान कसा हिरावला जाऊ शकतो याचे भयावह उदाहरण ठरेल. या प्रकरणात पुणे पोलिसांनी सहा महिलांना अटक केली. मात्र या सहा महिलांनी आता मुंबई उच्च न्यायालयात हेबियस कॉर्पस याचिका दाखल केली आहे. त्यांचा दावा आहे की त्यांची अटक बेकायदेशीर आहे. या याचिकेवर २२ जून २०२६ रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे न्यायालयासमोर आता दोन प्रश्न उभे राहतीलपहिला, अटकेची कायदेशीर वैधता आणि दुसरा, मूळ आरोपांचे गांभीर्य. परंतु या प्रकरणाचा सर्वात महत्त्वाचा पैलू न्यायालयीन नाही; तो सामाजिक आहे. भारतात गेल्या काही दशकांत अनेक स्वयंघोषित गुरू, बाबा आणि आध्यात्मिक नेत्यांविरोधात गंभीर आरोप झाले. काही प्रकरणांत न्यायालयांनी दोषसिद्धीही केली. तरीही समाजातील एका वर्गाची व्यक्तिपूजेची मानसिकता बदलताना दिसत नाही. प्रत्येक वेळी नवा गुरू, नवा चमत्कार आणि नवी भक्तमंडळी निर्माण होताना दिसतात. विशेष म्हणजे, या प्रकरणातील पीडित महिला उच्चशिक्षित असल्याचे समोर आले आहे. यामुळे अंधश्रद्धा ही केवळ अशिक्षित किंवा ग्रामीण समाजाची समस्या आहे हा समज पुन्हा खोटा ठरतो. शिक्षण माणसाला माहिती देऊ शकते; परंतु विवेक, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित झाली नाही तर उच्च शिक्षणसुद्धा अंधभक्तीपासून संरक्षण देऊ शकत नाही. या प्रकरणात तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे, तर राज्य सरकारच्या वतीने शासकीय वकील शिशिर हिरे न्यायालयात बाजू मांडणार आहेत. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने आरोपांची सत्यता अद्याप सिद्ध झालेली नाही. त्यामुळे कोणालाही दोषी किंवा निर्दोष ठरविणे योग्य ठरणार नाही. मात्र समाजाने या घटनेकडे केवळ गुन्हेगारी बातमी म्हणून न पाहता एक गंभीर सामाजिक इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. खरा प्रश्न राधामोहन मिश्रा कोण आहेत हा नाही; खरा प्रश्न असा आहे की एखादी व्यक्ती स्वतःला ''दैवी अवतार'' घोषित करते आणि समाजातील काही लोक ते कोणताही पुरावा न मागता स्वीकारतात कसे? जेव्हा श्रद्धा विवेकावर मात करते, तेव्हा अंधश्रद्धा जन्म घेते. आणि जेव्हा अंधश्रद्धा संघटित स्वरूप धारण करते, तेव्हा व्यक्तीचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि कधीकधी तिचे संपूर्ण आयुष्य धोक्यात येते. २२ जूनच्या सुनावणीत न्यायालय काय निर्णय देईल हे पुढील काळात स्पष्ट होईल. मात्र या प्रकरणाने आधीच एक महत्त्वाचा संदेश दिला आहेलोकशाही व्यवस्थेत कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा मोठी नाही. अध्यात्माचा आदर केला जाऊ शकतो; पण अध्यात्माच्या नावाखाली प्रश्न विचारण्याचा अधिकार गमावला जाऊ नये. श्रद्धेला विवेकाची जोड नसेल, तर ती सहजपणे शोषणाचे साधन बनू शकते. आणि म्हणूनच, पुण्यातील हे प्रकरण केवळ एका गुरूविरोधातील आरोपांचे प्रकरण नाही; ते आधुनिक भारतातील श्रद्धा, अंधश्रद्धा आणि उत्तरदायित्व यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे.

## कवडगाव ते चाकरवाडी पायी दिंडी सोहळ्याची जय्यत तयारी; २० वर्षांची परंपरा यंदाही भक्तिभावात रंगणार

**कवडगाव । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील कवडगाव येथून श्रीक्षेत्र चाकरवाडीपर्यंत निघणाऱ्या पायी दिंडी सोहळ्याची जय्यत तयारी पूर्ण झाली असून यंदा हा भक्तिमय सोहळा अधिक उत्साहात आणि श्रद्धाभावाने पार पडणार आहे. सद्गुरु श्री संत माऊली दादा चाकरवाडीकर महाराज यांच्या २६ व्या पुण्यस्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या दिंडी सोहळ्याला यंदा २० वर्षे पूर्ण होत असल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



बुधवार, दि. २४ जून २०२६ रोजी सकाळी ग्रामप्रदक्षिणा आणि बजरंगबलीच्या दर्शनाने दिंडीचे प्रस्थान होणार आहे. टाळ-मृदंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या अखंड घोषात आणि भगव्या पताकांच्या साक्षीने निघणारी ही दिंडी पुढील पाच दिवस विविध गावांमधून मार्गक्रमण करणार आहे. दिंडीच्या प्रवासात भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. शेकडो वारकरी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक या सोहळ्यात सहभागी होत भक्तीचा अनोखा अनुभव घेतात. दिंडीचा पहिला मुक्काम २४ जून रोजी भगवान बाबा प्रतिष्ठान, वडवणी येथे होणार आहे. त्यानंतर २५ जून रोजी खडकी, २६ जून रोजी कोरडेवाडी आणि २७ जून रोजी देवगाव येथे मुक्काम करण्यात येणार आहे. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी हरिजागर, भजन, कीर्तन, प्रवचन, हरिपाठ आणि नामस्मरणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून जाणार आहे. रविवार, दि. २८ जून रोजी सायंकाळी दिंडी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे दाखल होईल. त्यानंतर सोमवार, दि. २९ जून रोजी सकाळी चाकरवाडी नगरप्रदक्षिणा काढण्यात येणार असून दिंडी सभामंडपात पोहोचेल. यावेळी संत माऊली दादा यांच्या पुण्यस्मरणानिमित्त काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात येणार आहे. तसेच हरिनाम सप्ताहाचा समारोपही याच दिवशी होणार असून हजारो भाविकांच्या उपस्थितीत धार्मिक कार्यक्रम पार पडतील. दिंडी सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण प्रवासात घुमणारा विठ्ठल नामाचा गजर. ''माऊली माऊली'', ''ज्ञानोबा माऊली'' आणि ''जय हरी विठ्ठल'' या नामघोषाने वातावरण भक्तिमय बनते. वारकरी परंपरेचे जतन आणि संतांच्या विचारांचा प्रसार हे या दिंडीमागील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे आयोजकांनी सांगितले. भाविकांच्या सोयीसाठी दिंडीदरम्यान जेवण, चहा, नाश्ता, पिण्याचे पाणी तसेच मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व वयोगटातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. गेल्या दोन दशकांपासून ही दिंडी श्रद्धा, सेवा आणि भक्तीचा संदेश देत समाजात आध्यात्मिक एकात्मता निर्माण करत आहे. ह.भ.प. अशोक महाराज चोले, प्रमोद आप्पा पटाणे, सूर्यकांत चांभरे सर, आबा काळे, डॉ. भागवत आरडे, विणेकरी रंगनाथ चांदर, समस्त ग्रामस्थ, भजनी मंडळ कवडगाव आणि माऊली भक्त परिवार यांच्या वतीने सर्व वारकरी, भक्तगण आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. श्रद्धा, भक्ती आणि संतपरंपरेचा वारसा जपणारा हा दिंडी सोहळा भाविकांसाठी खऱ्या अर्थाने आनंदाची पर्वणी ठरणार आहे.

## माजलगाव भाजपाच्या वतीने जागतिक योग दिन

### नियमित योगा केल्याने आरोग्य निरोगी राहते-विनायक रत्नपारखी



**माजलगाव । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योगदिन निमित्त माजलगाव भाजपाच्या वतीने लोकनेत्या ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे आणि माजी खासदार डॉ प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांच्या सूचनेनुसार व शंकर देशमुख भाजपा जिल्हाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली दि २१ जुन रविवार रोजी भारतीय जनता पार्टी माजलगाव शहर शहर मंडळ तालुक्याच्या वतीने माजलगाव येथील सक्सेस पब्लिक स्कूल येथे योग दिन संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेचे प्रतिमा पूजन करून झाली.तसेच या योग दिनाच्या कार्यक्रमाला नामवंत योगशिक्षक म्हणून नावलौकिक असणारे बालाजी गरुड यांचा सत्कार करण्यात आला . कार्यक्रमाचे प्रस्ताविक शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले.याप्रसंगी प्रस्ताविकपर मनोगत व्यक्त करताना रत्नपारखी म्हणाले योग नियमित सातत्याने केले तर जीवन आनंदी जाईल व आपल्याला कुठलाही प्रकारचा आजार होणार नाही व आरोग्य निरोगी राहील , तसेच पद पैसा प्रतिष्ठा असून देखील जर आपले आरोग्य चांगले नसेल तर जीवन आनंदात जाणार नाही त्यामुळे जीवन आनंदी जाण्यासाठी रोज नित्य नियमाने व्यायाम योगासने करणे गरजेचे, निरोगी व शांत मन यांची गुरुकिल्ली म्हणजे योग , योगासने केल्यामुळे केवळ शरीरास नाही तर विचारही सकारात्मक होतात असे विनायक रत्नपारखी यांनी सांगितले. तसेच बालाजी गरड म्हणाले नियमित योग केल्याने एकाग्रता वाढून शरीर प्रसन्न राहते माणसाचे आयुर्मान वाढते कुठल्याही प्रकारचा आजार न होता उत्तम आरोग्य लाभून दीर्घायुष्य लाभते . कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना भाजपा सरचिटणीस कैलासराव खुरपे म्हणाले बालाजी गरुड यांनी आम्हाला योगा विषयीचे महत्त्व सांगून खूप अमूल्य असे मार्गदर्शन केले व निखिल वाघमारे सर यांनी योग दिन करण्यासाठी शाळा देऊन सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल आभार मानले. या योग शिबिरास भाजपाचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके,डॉक्टर अशोकराव तिडके,डॉक्टर प्रशांत पाटील, अभय होके पाटील,पवन मोगरेकर,विनोद लड्डा,रामेश्वर चव्हाण,शरद पवार, राजेभाऊ मिटकरी,अतुल कुलकर्णी, किशोर सावंत,कैलास जोशी यांच्यासह विविध पदाधिकारी कार्यकर्ते योग प्रेमी उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर पंचमुखी हनुमान मंदिर बायपास रोड येथे ज्ञानेश्वर मेंडके व माजी नगराध्यक्ष डॉक्टर अशोकराव तिडके यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवी गायकवाड यांनी विशेष प्रयत्न केले.

## क्रांतिवीर लहुजी साळवे आयोगाच्या शिफारशींचे वाचन व्हावे

### अनुसूचित जाती एकत्रित राहिल्या पाहिजेत-अजय सरवदे

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

**अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया राज्य शासनाने तात्काळ थांबवावी, या मागणीसाठी बीड ते मंत्रालय मुंबई असा पायी लाँग मार्च काढण्यात आला आहे. दहा दिवसांचा प्रवास पूर्ण करत हा लाँग मार्च २० जून रोजी पिंपरी-चिंचवड येथे दाखल झाला. यानिमित्त स्थानिक आंबेडकरी बांधवांच्या वतीने भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते.**



यावेळी लाँग मार्चचे समन्वयक अजय सरवदे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशींबाबत आमदार अमित गोरखे, विष्णू कसबे, अजिंक्य चांदणे, राजेश घोडे आणि प्रा. मिलिंद आव्हाड यांनी समाजासमोर सविस्तर भूमिका मांडावी. आयोगातील आरक्षण उपवर्गीकरण आणि मातंग समाजाला स्वतंत्र ५ टक्के आरक्षण या दोन मुद्द्यांपलीकडे जाऊन मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी करण्यात आलेल्या इतर ६६ शिफारशी जनतेपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सरवदे म्हणाले की, अनुसूचित जातींमध्ये फूट पडू नये. सर्व घटकांनी एकत्र राहून शिक्षण, रोजगार, आर्थिक उन्नती आणि सामाजिक न्यायासाठी संघर्ष केला पाहिजे. आयोगातील समाजहिताच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. अजय सरवदे यांनी केलेल्या रोखठोक, अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणीमुळे सभास्थळी उपस्थितामध्ये विशेष उत्सुकता निर्माण झाली असून, अनुसूचित जातींची एकता आणि समाजहिताच्या प्रश्नांवर व्यापक चर्चा घडून आली.

## पाटोदा शहरात भीषण पाणीटंचाई; नगरपंचायतीचे दुर्लक्ष, टँकर वितरणात मनमानी कारभार

**पाटोदा । प्रतिनिधी**

**ऐन उन्हाळ्यात पाटोदा शहरात पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असून, १२ लिटर पाणी ३०० रुपयांना विकत घेण्याची वेळ सर्वसामान्यांवर आली आहे. एकीकडे पाणी विकत घेताना गरिबांच्या खिशाला कात्री लागत असताना, दुसरीकडे नगरपंचायतीचा कारभार पूर्णपणे विस्कळीत झाला आहे.**

शहरातील वार्ड क्रमांक ६ मध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना मोठा भेदभाव केला जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. टँकरचालकांकडून 'तोंड पाहून' पाणी वाटप केले जात असल्याने अनेक कुटुंबे पाण्यापासून वंचित राहत आहेत. ज्यांची वशिलेबाजी आहे, त्यांनाच प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पाणी टंचाईच्या या गंभीर समस्येकडे स्थानिक नगरसेवकांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. नागरिकांना भेडसावणाऱ्या या प्रश्नावर उपाययोजना करण्याऐवजी नगरसेवक 'बघ्याची भूमिका' घेत आहेत. विशेष म्हणजे, नगरसेवक स्वतःच्या विकासकामांत किंवा गुत्तेदारी (कॉन्ट्रॅक्ट) सांभाळण्यातच अधिक व्यस्त असल्याचे चित्र आहे. स्थानिक आमदारांनीही या गंभीर परिस्थितीकडे पाठ फिरवल्याने पाटोदा शहराला नेमका वाली कोण? असा संतापजनक प्रश्न उपस्थित होत आहे. आम्ही लोकप्रतिनिधींना निवडून दिले ते आमच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी, पण आज आम्हाला पिण्याच्या पाण्यासाठी ३०० रुपये मोजावे लागत आहेत. नगरपंचायत प्रशासनाचा धाक उरला नाही का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी तातडीने याकडे लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## पान १ वरून...

### पावसाळी अधिवेशनात महिला

करण्यासाठी उपसमिती स्थापन करण्यात आली असून त्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सहभागी आहेत. गरजेनुसार निकषांमध्ये बदल करून निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, राज्यातील चिंताजनक पावसाच्या परिस्थितीकडेही मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले. एल-निनोच्या प्रभावामुळे मान्सून लांबला असून राज्यात सरासरीपेक्षा सुमारे ८० टक्के कमी पाऊस झाला आहे. कोकणात ८६ टक्के, तर मराठवाड्यात ७९ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. काही जिल्ह्यांमध्ये अद्याप पावसाचा थेंबही पडलेला नसल्याचे त्यांनी सांगितले.ङ्गकोकणात २३ जूनपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून विदर्भ आणि मराठवाड्यात कमी ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे. सर्वदूर पेरणीयोग्य पाऊस अद्याप झालेला नसल्याने शेतकऱ्यांनी किमान १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच पेरणीचा निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. राज्यातील धरणांमधील पाणीसाठा सध्या २४ टक्क्यांवर असून गेल्या वर्षी याच कालावधीत तो ३३ टक्के होता. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन शेतीसाठीचे आवर्तन बंद करण्यात आले असून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. ''मान्सून आणखी लांबला तर संकट अधिक गडद होऊ शकते. त्यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांची नाराजी पत्करूनही उपसा सिंचनावर निर्बंध घालावे लागले,'' असे त्यांनी सांगितले. राज्यात बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी न करता हवामानाचा अंदाज आणि पावसाची स्थिती पाहून निर्णय घ्यावा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

---------------

### ओमराजेंचे ठरले, शिंदेंच्या

शिंदेंच्या शिवसेनेत जावे, असा सूर काहींनी व्यक्त केला. त्यानंतर, शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार तानाजी सावंत हेही गोवर्धनवाडी येथे पोहोचले. ओमराजे निंबाळकर शिवसेनेमध्ये येणार आहेत, विकासाच्या दृष्टीने ओमराजे निंबाळकर निर्णय घेणार आहेत, असा गौप्यस्फोटच सावंत यांनी केला आहे. भाजप आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचे जिल्ह्यातील वाढते प्रस्थ, सत्ता नसल्याने निधीसाठी होत असलेली कसरत, त्या पार्श्वभूमीवर ओमराजेंनी सत्तेत जाण्याचा निर्णय घेतला आहे. सत्तेत गेल्याशिवाय लोकांची काम करता येणार नाही ही त्यांची भावना आहे. ऑपरेशन टायगर मध्ये ओमराजे निंबाळकर यांची जबाबदारी तानाजी सावंत यांच्यावर दिल्याची चर्चा होती. तानाजी सावंत यांनी आपल्यावर ऑपरेशन टायगरची जबाबदारी असल्याचा दुजोरा दिला. तसेच, पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरणी कोर्टाचा निर्णय झाला, त्यामुळे माझे ओमराजे यांच्याशी कौटुंबिक संबंध असल्याने आपण त्यांची भेट घेण्यासाठी आल्याचे तानाजी सावंत यांनी स्पष्ट केले.

------------

### ५६ टक्के कमिशन घेणारे

कंत्राटदारांनी अधिवेशन घेऊन कामांची बिले मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कमिशन द्यावे लागत असल्याचे सांगितले. कंत्राटदारांची तब्बल एक लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित आहेत. जल जीवन मिशनच्या निधीत कपात झाली असून अनेक विकासकामे रखडली आहेत. दुसरीकडे राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे अशी टीका सतेज पाटील यांनी केली. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील म्हणाले, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे. महिलांवर अत्याचार वाढले आहे. ड्रग्सचे प्रमाण राज्यात प्रचंड वाढले आहे. अशा प्रकरणात छोट्या लोकांना अटक होते, पण मास्टर माईंड मात्र मोकाट असतात. अमली पदार्थ विकणारे आणि पोलिसांचे हितसंबंध आहेत यातून या घटना वाढत आहे. देवस्थानच्या जमिनीचा घोटाळा मागील अधिवेशनात मांडला. पण काही कारवाई नाही अशी टीका जयंत पाटील यांनी केली. सरकार विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी केवळ टिंगल-टवाळी करत आहे. विरोधकांनी दिलेल्या पत्रातील व्याकरणावर भाष्य करण्यापेक्षा त्यातील प्रत्येक मुद्द्यांवर उत्तर देण्याची जबाबदारी सरकारची आहे,अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली. जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची तयारी नसलेल्या सरकारसोबत औपचारिक चहापानाला उपस्थित राहणे योग्य नसल्याने महाविकास आघाडीने या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. राज्यातील १३ कोटी जनतेच्या हिताचे प्रश्न सोडविणे हे सरकारचे कर्तव्य असून पावसाळी अधिवेशनात हे सर्व मुद्दे महाविकास आघाडी आक्रमकपणे मांडणार असल्याची भूमिका महाविकास आघाडीने पत्रकार परिषदेत मांडली.

---------------

### गेवराई वाळू घोटाळा: तहसीलदाराला

मांडणार असल्याचे सांगितले जात आहे. राज्य शासनाने गरिबांच्या हक्कासाठी घरकुलधारकांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, गेवराई तहसीलदारांनी या शासनाच्या निर्णयाला केराची टोपली दाखवत, ही वाळू नियमबाह्य पद्धतीने खुल्या बाजारात विकून तब्बल ९० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. आमदार विजय पंडित यांनी याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे ठोस पुरावे सादर करून तक्रार केली होती. यानंतर पोलिसांनी १२ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. मात्र, या सर्व प्रकरणाचे सूत्रधार म्हणून तहसीलदारांचे नाव समोर येत असतानाही त्यांना अद्याप वाचवले जात असल्याचा आरोप विविध संघटनांकडून केला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित तहसीलदाराचा प्रस्ताव केवळ राज्य शासनाकडे पाठवून जबाबदारी झटकल्याचे दिसून येत आहे. या ९० कोटींच्या वाळू घोटाळ्याची व्याप्ती मोठी असल्याने आता विविध सामाजिक संघटना आक्रमक झाल्या असून, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदने दिली आहेत. हे प्रकरण आता काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी गांभीर्याने घेतले असून, ते आगामी विधानसभा अधिवेशनात हा मुद्दा लावून धरणार आहेत.

------------

### आजपासून विधिमंडळाचे पावसाळी

पुण्यातील विषारी दारूने घेतलेले बळी, अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचे समर्थन आणि विरोध या पार्श्वभूमीवर सोमवारपासून सुरू होणारे राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन वादळी ठरण्याची चिन्हे आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनात केलेल्या घोषणेनुसार मुख्यमंत्री फडणीस यांनी शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. मात्र, या योजनेतील अटी, शर्ती जाचक असल्याची टीका होत असून विरोधी पक्षाने सरसकट कर्जमाफीची मागणी केली आहे. या मागणीसाठी आमदार रोहित पवार यांनी अलीकडेच पंढरपूर येथे आंदोलन केले, तर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनीही आंदोलन छेडले आहे. त्यामुळे विरोधकांकडून सरसकट शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा उपस्थित केला जाणार आहे. उद्धवसेनेतील गटातील खासदार फुटीचे पडसाद अधिवेशनात उमटण्याची शक्यता आहे. पावसाळी अधिवेशन तोंडावर असताना शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन टायगर केले. त्यामुळे उद्धवसेना आणि महाविकास आघाडीत अस्वस्थता आहे. ही अस्वस्थता दूर सारून अधिवेशनात एकजुटीने सत्ताधारी पक्षाशी दोन हात करण्याचे आव्हान विरोधकांसमोर आहे.

------------

### वाहन चोरीचा विमा क्लेम

तसेच, वाहन मालकाने गाडी फायनान्स कंपनीकडे सुपूर्द केल्याचा कोणताही लेखी पुरावा किंवा चोरीबाबतची सविस्तर माहिती फायनान्सरने विमा कंपनीला दिली नव्हती. सुरुवातीला जिल्हा ग्राहक मंचाने फायनान्सरच्या बाजूने निकाल दिला होता. मात्र, राज्य ग्राहक आयोगाने हा निर्णय रद्द केला. पुढे राष्ट्रीय ग्राहक आयोगानेही राज्य आयोगाचा निर्णय योग्य ठरवला. अखेर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, ''विम्याचा करार हा केवळ विमाधारक (गाडीचा मालक) आणि विमा कंपनी यांच्यातील वैयक्तिक करार असतो, हा कायद्याचा प्रस्थापित नियम आहे. या कराराच्या आधारे कोणतीही तिसरी व्यक्ती विम्याच्या रकमेवर दावा करू शकत नाही. प्रस्तुत प्रकरणात, मूळ मालकाने गाडी फायनान्स कंपनीकडे सुपूर्द केली होती असे गृहीत धरले, तरीही फायनान्स कंपनीला गाडीचा कायदेशीर मालक मानता येत नाही. त्यामुळे विमा कंपनीला फायनान्स कंपनीचे नुकसान भरून देण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही.''

---------------

### मान्सून सक्रिय : कोकण, मध्य

तर मराठवाड्यात मध्यम पावसाचा अंदाज आहे. विदर्भात मात्र २५ जूनपर्यंत उष्णतेची लाट राहणार आहे. त्या भागात २६ ते १ जुलैदरम्यान पावसाची शक्यता आहे. पुणे शहर परिसरातील काही भागांत रविवारी मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. काही भागांत पाऊस, तर काही भाग कोरडा, असे वातावरण होते. पर्वती, कात्रज भागात जोरदार पावसाने बहार आणली.

-----------

### आजारांना दूर ठेवण्यासाठी

आत्मा आणि शरीर या तिन्हींचा विचार करण्यात आलेला आहे. योग विद्येमध्ये मनाचा निसर्गातील तत्वांशी असलेला संबंध हा पुनर्जीवित करण्यात येतो. सातत्यपूर्ण योग केल्याचा परिणाम शरीरावर तर होतोच पण मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यावरही होतो. कार्यक्रम प्रसंगी शिवप्रकाश यांनीही आपले विचार मांडले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध योगासने केली. कार्यक्रमाला योगशिक्षक, योग करणारे नागरिक उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २२ जून २०२६
३

## थोडक्यात

### वांगी (बु.) येथे शेतकऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन; कर्जमाफी व विम्यासाठी एल्गार

माजलगाव । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी तसेच बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १७,५०० विमा रक्कम सरसकट देण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी वांगी (बु.), ता. माजलगाव, जि. बीड येथील शेतकऱ्यांनी अन्नत्याग आंदोलनाचा इशारा दिला आहे. शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी तहसीलदार, माजलगाव यांना निवेदन देऊन आंदोलनाची माहिती दिली. निवेदनानुसार, २२ जून २०२६ रोजी सकाळी १०:३० ते दुपारी ३:३० या वेळेत वांगी (बु.) येथे सर्व शेतकरी अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ अनेक पात्र शेतकऱ्यांना मिळालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून शासनाने तातडीने सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री यांनी जाहीर केल्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १७,५०० विमा रक्कम मिळावी आणि खरीप हंगाम २०२६ च्या पीक विमा योजनेत पूर्वीप्रमाणे चार ट्रिगरचा समावेश करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.



### संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन दिंद्रुड शाखेत रक्तदान शिबिर संपन्न

दिंद्रुड । प्रतिनिधी

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन, दिल्लीच्या दिंद्रुड शाखेच्या वतीने शनिवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दिंद्रुड परिसरातील रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले.

गेल्या अठरा वर्षांपासून संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या दिंद्रुड शाखेमार्फत संत निरंकारी भवन येथे विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता अभियान तसेच रक्तदान शिबिरांचे नियमित आयोजन करण्यात येते. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात



तब्बल १३० रक्तदात्यांनी रक्तदान करून या उपक्रमात सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते माधव केंद्रे, सपोनि महेश भोसले, माजी पंचायत समिती सदस्य कैलास ठोंबरे, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, सुरेश पासंगे, विलास पारेकर व बालासाहेब फपाळसह दिंद्रुड परिसर,मोगरा,केसापुरी कॅम्प,हरदेव नगर येथील अनुयायांची प्रमुख उपस्थिती होती. संत निरंकारी मिशनचे तिसरे सद्गुरू बाबा गुरबचन सिंह जी महाराज यांच्या १९८० मध्ये झालेल्या हत्येनंतर चौथे सद्गुरू बाबा हरदेव सिंह जी महाराज यांनी अनुयायांना सूडभावना न बाळगता मानवसेवेचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. रक्त नाल्यात वाहण्यापेक्षा ते गरजूंना जीवनदान देण्यासाठी रक्तदानाच्या माध्यमातून अर्पण करावे, असा संदेश त्यांनी दिला. त्यानंतर आजपर्यंत जवळपास दहा हजार रक्तदान शिबिरांमधून पंधरा लाखांहून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केल्याची माहिती दिंद्रुड शाखेचे मुखी शंकर यादव यांनी प्रास्ताविकात दिली. संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या अनुयायांचे सामाजिक कार्य प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. गणेश ठोकरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवादल चे सर्व महात्मा व सेवा दलभगिनी, सेवा दल अधिकारी यांनी मोलाचे योगदान दिले व रक्तदान शिबिरानंतर सायंकाळी अहिल्यानगर झोनचे प्रचारक महात्मा धीरज भोसले यांच्या उपस्थितीत सत्संग संपन्न झाला.यावेळी स्वाराती रुग्णालय, अंबाजोगाई येथील रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अविनाश काळे, शैलेश वरवटकर, अजय जोगदंड, समाजसेवक आनंद सिताप, शशीकांत पारखे, रक्तपेढी तंत्रज्ञ मधुकर फड, मुरलीधर पवार, जगदीश रामदासी, शेख बाबा तसेच प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. जिल्हा रुग्णालय, बीड येथील रक्त संक्रमण अधिकारी शुभांगी गिते, कोमल कदम, जनसंपर्क अधिकारी पल्लवी निकाळजे, रक्तपेढी तंत्रज्ञ रामनाथ खेडकर, नितीन सोळंके, विनोद रावताळे, संतोष गायकवाड, सतीश गायकवाड व वसंत वनवे यांनी रक्तसंकलनाचे काम पार पाडले.

# शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न तातडीने सोडवा, सौहार्दाने वागा : जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

महसूल प्रशासन हे शासन आणि नागरिक यांच्यामधील सर्वात महत्त्वाचा दुवा असून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांचे प्रश्न तातडीने सोडविणे ही महसूल यंत्रणेची प्राथमिक जबाबदारी आहे. विशेषतः शेतरस्ते हे शेतकऱ्यांच्या जीवनाशी आणि शेतीशी थेट निगडित असल्याने अडविलेले वादग्रस्त रस्ते प्राधान्याने मोकळे करावेत, तसेच ग्रामीण नागरिकांशी सौजन्याने व संवेदनशीलतेने वागावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

तहसील कार्यालय बीड येथे शुक्रवारी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महसूल विभागाच्या विविध कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. शेतकऱ्यांना शेतीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्त्यांची आवश्यकता अत्यंत महत्त्वाची असून अनेक ठिकाणी शेतरस्त्यांअभावी नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये विलंब न करता कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून रस्ते मोकळे करण्यासाठी प्रभावी कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच शेतकरी हा प्रशासनाचा केंद्रबिंदू असून त्याच्या प्रश्नांकडे केवळ महसुली विषय म्हणून न पाहता मानवी दृष्टिकोनातून पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकीच्या प्रारंभी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे स्वागत करून बीड तालुक्यात राबविण्यात आलेल्या विविध महसुली उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान'', अतिक्रमणमुक्त शेतरस्ते मोहीम, महसूल सेवा शिबिरे, फेरफार निपटारा, डिजिटल सेवा वितरण, नैसर्गिक आपत्ती पंचनामे तसेच शेतकरी हिताच्या विविध उपक्रमांबाबत त्यांनी माहिती सादर केली. तालुक्यातील अनेक




वर्षांपासून प्रलंबित असलेले शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी महसूल यंत्रणेने केलेल्या प्रयत्नांचाही त्यांनी आढावा दिला.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांना नागरिकाभिमुख प्रशासनाची जाणीव करून देत आपल्या मुख्यालयात आणि कार्यालयात अधिकाधिक वेळ उपलब्ध राहण्याचे निर्देश दिले. महसूल सेवा घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना अनावश्यक हेलपाटे मारावे लागू नयेत, अर्जदारांना वेळेत सेवा मिळावी आणि प्रत्येक प्रकरणाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहावे, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिक हे प्रशासनाकडे अपेक्षेने पाहत असतात. त्यामुळे त्यांच्या समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी महसूल यंत्रणेने अधिक संवेदनशीलतेने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, महसूल वसुली, फेरफार प्रकरणे, ई-अभिलेख, नागरिक सेवा, संजय गांधी निराधार योजना, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन तसेच इतर महसुली कामकाजाचा आढावा घेण्यात आला. शासनाच्या विविध योजना आणि सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने कार्य करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

नागरिकांच्या अर्जांचा वेळेत निपटारा, कार्यालयीन शिस्त आणि सेवा वितरणाची गुणवत्ता यावर विशेष भर देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीनंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तहसील कार्यालयाच्या विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये संजय गांधी विभागातील कामकाजाची माहिती घेतली, लाभार्थी प्रकरणांचा आढावा घेतला तसेच प्रलंबित प्रस्तावांबाबत सूचना केल्या. त्याचबरोबर गौण खनिज विभागातील संचिकांची तपासणी करून महसुली कार्यवाही, दंड वसुली आणि अनधिकृत उत्खननासंदर्भातील प्रकरणांचा आढावा घेतला. कार्यालयीन कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक करण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

बैठकीस तहसीलदार चंद्रकांत शेळके, तहसीलदार सुरेंद्र डोके, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, संभाजी थोटे, अण्णासाहेब वंजारे, प्रशांत सुपेकर उपस्थित होते. तसेच सहाय्यक महसूल अधिकारी महादेव चौरे, राहुल कसबे, वामन तोगरगे यांच्यासह मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि तहसील कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल कर्मचारी संघटना तसेच मंडळ अधिकारी-तलाठी संघटनेच्या वतीनेही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. बैठकीच्या शेवटी नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी आभार प्रदर्शन केले. बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महसूल प्रशासनाने केवळ कागदोपत्री कामकाज न करता प्रत्यक्ष गावपातळीवर जाऊन नागरिकांच्या अडचणी जाणून घ्याव्यात, शेतकऱ्यांशी संवाद साधावा आणि शासनाच्या लोकाभिमुख धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन केले. शेतकरी, नागरिक आणि प्रशासन यांच्यात विश्वासाचे नाते अधिक दृढ करण्यासाठी प्रत्येक महसूल कर्मचाऱ्याने उत्तरदायित्वाने काम करावे, असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

## ज्ञानराधा मल्टीस्टेटमधील अडकलेल्या पैशांसाठी १५ ऑगस्टला पाटोद्यात आमरण उपोषण; ठेवीदाराचा प्रशासनाला थेट इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमध्ये अडकलेली आपली हक्काची ठेव रक्कम व्याजासह परत मिळावी, यासाठी पाटोदा येथील एका संतप्त ठेवीदाराने थेट स्वातंत्र्यदिनी (१५ ऑगस्ट) उपविभागीय अधिकारी (एसडीएम) आणि तहसीलदार कार्यालयासमोर तीव्र आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. मागणी पूर्ण न झाल्यास आणि जिवाचे बरे-वाईट झाल्यास त्याची सर्व जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, पाटोदा येथील रहिवासी सतीश विक्रम गर्जे यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या पाटोदा शाखेतील खाते क्रमांक १४००५३४२ मध्ये आपली कष्टाची ₹२,५६,१५३/- (दोन लाख छप्पन्न हजार एकशे पन्नास रुपये) इतकी रक्कम मुदत ठेव/बचत स्वरूपात ठेवली होती. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून ही सोसायटी पूर्णपणे बंद आहे. या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक () कार्यालय बीड यांच्यामार्फत सोसायटीवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

दोन वर्षांपासून केवळ पोकळ आश्वासने

प्रशासकांनी कर्ज वसुलीची प्रक्रिया वेगाने राबवून सोसायटीकडे मोठ्या प्रमाणावर निधी जमा केला असल्याची माहिती आहे. असे असतानाही, सामान्य आणि हक्काच्या ठेवीदारांना अद्याप एक रुपयाही परत करण्यात आलेला नाही. गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करूनही ठेवीदारांच्या हाती केवळ आश्वासनांशिवाय काहीही पडलेले नाही. कष्टाचे पैसे अडकल्यामुळे गर्जे यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती खालावली असून, त्यांना प्रचंड मानसिक आणि शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

...तर स्वातंत्र्यदिनी प्राणाची आहुती देणार!

प्रशासकांकडे पैसे जमा असूनही ठेवीदारांना त्यांचे हक्काचे पैसे न वाटणे हा मोठा अन्याय आहे, अशी भावना ठेवीदाराने व्यक्त केली आहे. जर येत्या १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत ठेवीची रक्कम व्याजासह परत देण्याबाबत ठोस निर्णय किंवा लेखी आश्वासन मिळाले नाही, तर आगामी १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून तहसील कार्यालयासमोर तीव्र आमरण उपोषणास बसणार असल्याचे सतीश गर्जे यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. ''हक्काच्या पैशांसाठी माझ्यावर ओढवणाऱ्या या परिस्थितीमुळे माझ्या जिवाचे काहीही बरे-वाईट झाल्यास, त्याची संपूर्ण कायदेशीर व नैतिक जबाबदारी संबंधित प्रशासन आणि ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या प्रशासक मंडळाची राहील,'' असा गंभीर इशारा गर्जे यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हा उपनिबंधक बीड आणि पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनाही माहिती व आवश्यक कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत. आता यावर प्रशासन काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पान ६ वरुन...

### देवस्थान जमीन हंस्तातरण

देवस्थानांकडून मांडला जात आहे. विरासत म्हणजे सेवा चालू ठेवण्याचा अधिकार असून तो मालकीचा पुरावा मानता येणार नाही, असे मत व्यक्त होत आहे.

दरम्यान, प्रस्तावित समित्यांमध्ये अशा व्यक्तींना स्थान दिले जाऊ नये ज्यांनी देवस्थानांच्या जमिनीतील हिस्सा, उत्पन्नातील वाटा, मानधन किंवा मालकीसदृश अधिकारांची मागणी केलेली आहे. कारण कायदा तयार करताना अशा व्यक्ती देवस्थानांच्या व्यापक हिताऐवजी स्वतःच्या हिताच्या तरतुदी सुचवू शकतात. त्यामुळे समितीतील प्रत्येक सदस्याने स्वतःचा कोणताही हितसंबंध नसल्याचे जाहीर करावे, अशी मागणी पुढे येत आहे.देवस्थानांच्या प्रतिनिधींच्या मते, प्रस्तावित कायद्यामुळे नेमके काय फायदे आणि काय तोटे होणार आहेत, याचे स्पष्ट चित्र अद्याप समोर आलेले नाही. देवस्थानांच्या जमिनींचे संरक्षण कसे होणार, धार्मिक सेवांचे भवितव्य काय राहणार, उत्पन्नावर काय परिणाम होणार, सेवेकऱ्यांच्या हक्कांचे काय होणार आणि देवस्थाने भविष्यात भूमिहीन होणार नाहीत याची हमी काय, या प्रश्नांची उत्तरे शासनाने सार्वजनिकपणे देणे आवश्यक आहे.काही धार्मिक संस्थांनी अशीही भीती व्यक्त केली आहे की, कायद्यामध्ये योग्य संरक्षणात्मक तरतुदी नसल्यास त्याचा फायदा भूमाफिया, जमीन दलाल आणि देवस्थानांच्या मालमत्तेवर डोळा ठेवणाऱ्या स्वार्थी घटकांना होऊ शकतो. अनेक ठिकाणी आधीच देवस्थानांच्या जमिनींवर अतिक्रमणे, बेकायदेशीर व्यवहार आणि मालकी दाव्यांचे वाद सुरू आहेत. त्यामुळे नवीन कायदा अशा प्रवृत्तींना बळ देणारा ठरू नये, अशी मागणी होत आहे.

देवस्थानांच्या हिताचे प्रतिनिधी म्हणतात की, समित्यांमध्ये निवृत्त न्यायाधीश, धर्मादाय कायदा तज्ज्ञ, इतिहास संशोधक, महसूल तज्ज्ञ, पुरातत्त्व अभ्यासक, सेवेकरी प्रतिनिधी आणि विविध प्रकारच्या देवस्थानांचे प्रतिनिधी यांचा समावेश असावा. केवळ काही निवडक विश्वस्त किंवा विशिष्ट विचारांच्या व्यक्तींवर संपूर्ण राज्यातील देवस्थानांचे भविष्य सोपविणे योग्य ठरणार नाही.याशिवाय, प्रस्तावित कायद्याचा अंतिम मसुदा प्रसिद्ध करण्यापूर्वी राज्यभर सार्वजनिक सुनावण्या घेऊन सर्व हरकतींचा विचार करावा, समिती सदस्यांची नावे जाहीर करावीत आणि देवस्थानांना होणारे फायदे-तोटे स्पष्ट करणारी श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

देवस्थानांच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे की, देवस्थानांच्या जमिनी हा केवळ महसुलाचा विषय नाही. हा श्रद्धा, परंपरा, इतिहास, धार्मिक स्वायत्तता आणि सार्वजनिक संपत्तीच्या संरक्षणाचा विषय आहे. त्यामुळे कोणताही कायदा करताना देवस्थानांचे अस्तित्व, आर्थिक स्वावलंबन आणि धार्मिक परंपरा सुरक्षित राहतील याची खात्री होणे आवश्यक आहे.

भक्तांच्या श्रद्धेचा विषय केवळ महसुली प्रश्न नाही

देवस्थानांच्या जमिनी हा फक्त जमीन महसुलाचा विषय नाही. या जमिनींमागे अनेक पिढ्यांची श्रद्धा, दान आणि धार्मिक परंपरा जोडलेल्या आहेत. त्यामुळे कायदा करताना भक्तांच्या भावना आणि देवस्थानांचे दीर्घकालीन हित लक्षात घेतले पाहिजे.-अशोक येडे देवस्थान हितचिंतक भक्त

### पालिका पोट निवडणुकीत

अटीतटीची होईल, असे चित्र निर्माण झाले होते. भारतीय जनता पक्षाच्या वतीने माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार यांनी वार्ड पिंजून काढला तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार विजयसिंह पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी ही प्रचारात आघाडी घेतली होती.

वार्ड क्रमांक अकराच्या उमेदवारांना मिळालेली मते

काझी सायेमा आकेफ १११९

मेहरूनिस्सा मन्सूर शेख ११ , फराह बेगम अब्दुल मन्नान ५९८ , राहुल जिजा खंडागळे ११३३ , पठाण शहारूख २० जालिंदर पिसाळ ५४२ , शेख आलमान शे. सुभान ३० , नाटोला ३५ मते मिळाली आहेत.

वार्ड क्रमांक अकरा मुस्लिम बहुल वार्ड असून, खालोखाल ओबीसी, दलित समाजाच्या निर्णायक मताचा टक्का आहे. त्यामुळे, येथे मताची फाटाफूट होईल, ओबीसी, दलित आणि

मुस्लिम समाजाची मते भाजपाच्या उमेदवारांना पडणार नाहीत,असा तर्क राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जाणकारांनी लावला होता. मात्र, हा तर्क मतदारांनी फोल ठरवून, सर्वाधिक मते भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या पारडय़ात टाकल्याचे निकालानंतर दिसून आले. भाजपाच्या दोन्ही उमेदवारांना जवळपास सारखीच ,म्हणजेच ११३३ व १११९ मते मिळाली आहेत.गेवराई पोलीस ठाण्याचे पोनि किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई नगर परिषदेच्या मतमोजणी केंद्रा बाहेर पोलीसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विजयी उमेदवारांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी शांततेत आनंदोत्सव करावा, असे आवाहन करण्यात आले होते.

### माजलगाव येथे ७२ वर्षीय

हस्तक्षेपानंतर हालचाली;

गंभीर बाब म्हणजे, उफाडे हे दोन दिवसांपासून सरकारी रुग्णालयात जिंदगी आणि मृत्यूची लढाई लढत असतानाही, माजलगाव पोलीस प्रशासनाचा एकही जबाबदार अधिकारी किंवा अंमलदार त्यांचा जबाब नोंदवण्यासाठी रुग्णालयात पोहोचला नव्हता. या संवेदनशील घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी तात्काळ स्थानिक नेत्यांना व सहकाऱ्यांना दिली.माहिती मिळताच, मातंग समाजाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी थेट माजलगाव येथील पोलीस निरीक्षकांशी फोनवरून संपर्क साधला आणि पोलीस प्रशासनाच्या दिरंगाईबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. तसेच घटनेचे गांभीर्य लक्षात आणून दिले.पोलीस निरीक्षकांना फोन करून वस्तुस्थिती मांडल्यानंतर, पोलीस प्रशासनाला जाग आली. पोलिसांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य ओळखून सरकारी दवाखाना गाठला आणि जखमी राधाकिसन उफाडे यांचा रीतसर जबाब नोंदवून घेतला. यावेळी मातंग समाजाचे कार्यकर्ते सुनील शिंदे, उफाडे यांचे दोन्ही चिरंजीव आणि पवन शिंदे यांच्यासह समाजातील इतर प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.मातंग समाजातील वृद्ध नागरिकावर झालेला हा हल्ला अत्यंत निषेधार्ह आहे. दोन दिवस पोलीस फिरकले नव्हते, पण आम्ही संपर्क साधताच पोलिसांनी तात्काळ रुग्णालयात येऊन जबाब नोंदवला आहे. या प्रकरणातील दोषी समाजकंटकांवर कठोर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे, अन्यथा मातंग समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल.

-विनोद दादा हातागळे

या प्रकरणात आता पोलीस काय कारवाई करतात आणि त्या नराधम समाजकंटकांना कधी बेड्या ठोकतात, याकडे संपूर्ण माजलगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## निरामय जीवनासाठी योगा आवश्यक-डॉ. संजय तांदळे

### पोलीस मुख्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये ताण- तणाव वाढून आजाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. यातून सुटका शक्य नाही परंतु याचा दुष्परिणाम आरोग्यावर होणार नाही ईतकी शारीरिक आणि मानसिक क्षमता बांधणी करण्याची ताकद योगात आहे. म्हणून योग व ध्यान देखील महत्त्वाचे आहे. ध्यानामुळे आपण अंतर्मनाचा वेध एकाग्रता आणि मन: शांती वाढवू शकतो,आयुष्यात संकट आणि तान- तनावाच्या काळात.त्याचा अधिक लाभ होतो.ध्यान केल्याने मन शांती तर मीळते सोबत मानसिक संतुलनात कमालीची वाढ होऊन निर्णय क्षमता देखील वाढते. त्यामुळे योगा ही आधुनिक जीवनशैलीची संजीवनी मानली जाते. त्यासाठी निरामय जीवन जगण्यासाठी नियमित योगा करणे गरजेचे आहे. असे मत १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, प्रभारी अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१ जून २०२६ रविवार रोजी सकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान बीड जिल्हा पोलीस मुख्यालयात आयोजित केलेल्या पोलीस दलाच्या योग शिबिरात संवाद साधताना व्यक्त केले. योग प्रशिक्षक डॉ. संजय तांदळे व भारत ठोंबरे यांनी योग प्राणायाम व विविध प्रकारांच्या आसनांचे प्रात्यक्षिके दाखवून प्रत्येकी असनांचे फायदे सांगितले. शिबिराचे नियोजन व आभार प्रदर्शन पोलीस कल्याण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापुरे यांनी केले.कार्यक्रमास राखीव पोलीस उपनिरीक्षकष पी. उगलमुगले पोलीस हवालदार प्रमोद वारे आदी सह पोलीस कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

माजलगाव प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यर्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक शिक्षकेतर मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत यावर्षीची योग दिनाची संकल्पना वाढत्या वयासाठी योगा ही होती. योगा व प्राणायाम प्रशिक्षक नंदकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी उपस्थितीता मानवी जीवनात योगाचे व प्राणायामाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच उपस्थित सर्वांना वेगवेगळी योगासने,प्राणायाम,सूक्ष्म व्यायाम,ध्यान इत्यादि बद्दल माहिती दिली व सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन करून सध्याच्या धकाधकीच्या जीवनातील योगाचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन महाविद्यालयातिल राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकर्माधिकारी प्रा. ओमप्रसाद सारगे यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यकर्माधिकारी डॉ . सतीश डाके यांनी केले. सदरील कार्यक्रमासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. अर्चना कचरे, डॉ . बिलास काळे, डॉ. गणेश मोकासरे ,प्रा. प्रेमकुमार ठोंबरे,प्रा. कार्तिक पाचलेगावकर,प्रा. शिवाजी सुरवसे, प्रा. लक्ष्मण गिरी, प्रा. नवपुते, प्रा. शेजुळ मॅडम तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# २२ जून पासून आझाद मैदानावर सुरू होणाऱ्या आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

### बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन!

बीड । प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्पा द्या या मागणीसाठी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने २२ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनात बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या धोरणानुसार १ जून २०२६ पासून राज्यातील २०, ४०, ६० आणि ८० टक्के अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच वर्ग तुकड्यांना पुढील वाढीव टप्पा मंजूर मिळणे अपेक्षित होते. मात्र नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झालेल्या असताना देखील अद्यापही कोणताही निर्णय झालेला नाही त्यामुळे शिक्षक समन्वय संघ आणि महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने २२ जून २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनात राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्यातून शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर, उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर, उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर,

जिल्हा सचिव श्री. शेख सर, जिल्हा संघटक प्रताप देशमुख सर, जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला जिल्हा सचिव सौ. सुरेखा गायकवाड मॅडम, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अशोक मोरे सर, बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर, गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरूड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर, शिरूर तालुका अध्यक्ष श्री. दशरथ साबळे सर, माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर, परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर, धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# मान्सूनची सद्यस्थिती चिंताजनक; जून महिन्यात ३२ टक्क्यांची तूट

## नवे नियम जानेवारी २०२७ पासून लागू, शेतकऱ्यांना होणार फायदा

मुंबई / प्रतिनिधी

देशातील मान्सूनची सध्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली असल्याचे, खासगी हवामान एजन्सी स्कायमेटचे संचालक जी. पी. शर्मा यांनी म्हटले आहे. मुळातच यंदा मान्सूनचे आगमन उशिराने झाले असून, सुरुवातीचे काही दिवस प्रगती केल्यानंतर गेल्या एका आठवड्यापासून तो पूर्णपणे थबकला आहे. ८ जूनपासून मान्सूनची वाटचाल थांबली असून, तो कोकण किनारपट्टीवरून एक इंचही पुढे सरकलेला नाही. यासोबतच, जून महिन्यातील पावसात आतापर्यंत ३२ टक्क्यांची मोठी तूट नोंदवली गेली असून, 'एल-निनो'चा वाढता प्रभाव या चिंतेत आणखी भर घालत आहे, असे 'स्कायमेट'ने म्हटले आहे.





मान्सूनच्या या रखडलेल्या स्थितीचा थेट आणि सर्वात मोठा फटका कृषी क्षेत्राला बसत आहे. शर्मा यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, जून महिन्याचा दुसरा पंधरवडा आणि जुलै महिन्याचा पहिला पंधरवडा हा खरीप पेरण्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा काळ असतो. देशातील बहुतांश पेरण्या याच काळात होतात. मात्र, पावसाने ओढ दिल्यामुळे पेरणीच्या या महत्त्वपूर्ण हंगामासमोर सध्या मोठे संकट उभे राहिले आहे. योग्य वेळेत पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या आहेत आणि कृषी क्षेत्रासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. पश्चिम किनारपट्टीवरून मान्सून पुढे सरकण्याची सध्या तरी कोणतीही सकारात्मक चिन्हे दिसत नसल्याचे शर्मा यांनी सांगितले आहे. मुंबईला खऱ्या अर्थाने मान्सूनच्या पहिल्या दमदार पावसासाठी आणखी १० दिवस वाट पाहावी लागली, तरी त्यात आश्चर्य वाटू नये, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यापूर्वी, २०१९ साली एल-निनो वर्षांत, मान्सून मुंबईत सर्वात उशिरा म्हणजे २५ जून रोजी पोहोचला होता. थोडक्यात, मान्सूनची रखडपट्टी आणि आगामी काळातील हवामानाचा अंदाज पाहता, शेतीकामे आणि मुंबईसारख्या शहरांना पावसासाठी अजूनही प्रदीर्घ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# जनावरात होणारा अचानक गर्भपात! लक्षणे आणि उपाय

जनावरातील गर्भपात हा गाभण कालावधीत वेगवेगळ्या कारणामुळे कोणत्याही वेळी होऊ शकतो. काही वेळा निरोगी गाभण जनावरामध्ये अचानक गर्भपात झाल्याचे दिसून येते. गर्भपाताची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत तरी होणारा हा गर्भपात लेप्टोस्पायरोसिस या आजारामुळे होतो. गाभण जनावरांमध्ये चौथ्या महिन्याच्या पुढील आणि गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या जनावरांमध्ये गर्भपाताची समस्या दिसून येते.

आजाराचा प्रसार :लेप्टोस्पायरोसिस हा जीवाणूजन्य आजार असून १५० हून अधिक प्राण्यांच्या प्रजातीमध्ये हा रोग दिसून येतो. जास्त दूध देणाऱ्या जनावरांमध्ये लेप्टोस्पायरोसिस आजाराचा प्रादुर्भाव अधिक दिसून येतो. या रोगाचा प्रसार प्रामुख्याने गवत, पिण्याचे पाणी, चारा यावर आजारी जनावरांचे मूत्र, गर्भाशयाचा स्त्राव पडल्याने होत असतो. बाधित जनावरांचे मूत्र हे प्रसारास प्रमुख कारणीभूत घटक असते. एखाद्या जनावराला या रोगाची बाधा झाल्यास आजारपणानंतर जवळपास ४० दिवस या रोगाचे जंतु मुत्रा वाटे बाहेर पडत असतात. हा आजार सर्व पाळीव प्राणी, तसेच जनावरांपासून माणसांमध्येही याचा संसर्ग होत असतो. अति पावसाच्या, पाणथळ भागात जेथे पाणी साठून राहते तसेच ज्या ठिकाणी हवेत आर्द्रतेचे जास्त प्रमाण आहे अशा ठिकाणी लेप्टोस्पायरोसिस या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो.



या आजाराचे जीवाणू उंदराच्या शरीरात सुप्त अवस्थेत असतात. त्यांच्या मलमूत्राद्वारे झपाट्याने या आजाराचा प्रसार होत असतो.

आजाराची लक्षणे :या आजाराचा प्रादुर्भाव तत्काळ तीव्र, तत्काळ सौम्य आणि दीर्घकालीन तीव्र या तीन टप्प्यात दिसून येतो. एक महिन्यापर्यंतची वासरे या रोगाला पटकन बळी पडतात. गाभण जनावरांमध्ये चौथ्या महिन्याच्या पुढील आणि गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या जनावरांमध्ये गर्भपाताची समस्या दिसून येते. कोणतीही लक्षणे नसताना अचानकपणे जनावरांचा गर्भपात होणे हे या आजाराचे मुख्य लक्षण आहे. या आजाराचे निदान जनावरांच्या लघवीमधील रोगजंतूचा प्रादुर्भाव तपासून करता येते.

प्रतिबंधात्मक उपाय : घूस, उंदीर यांची संख्या कमी करण्यासाठी गोठ्यात तसेच आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता ठेवावी. शरीरावर जखम असल्यास त्वरित उपचार करावेत. लक्षणांनुसार प्रभावी प्रतिजैविके पशु वैद्यकांच्या सल्ल्याने द्यावीत.

# लोकसहभागातून देशी जातींच्या संवर्धनाला चालना द्यावी – दीपा मुधोळ

पुणे / प्रतिनिधी

''मानवी आरोग्याबरोबरच जमिनीच्या आरोग्याचाही प्रश्न गंभीर बनत आहे. जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी सेंद्रिय निविष्ठांचा वापर आवश्यक आहे. नव्या वाणांच्या विकासासोबतच अधिक पोषणमूल्य असलेल्या देशी जातींचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. तसेच जलसंधारण, मृदसंधारण आणि भूजल पुनर्भरणाकडे ग्रामपंचायतींनी विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे,'' असे प्रतिपादन समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांनी केले.



पुण्यात वनराई संस्थेतर्फे समाजकल्याण विभागाचे सहआयुक्त प्रमोद जाधव लिखित 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' या पुस्तकाच्या प्रकाशन व चर्चासत्राचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून मुधोळ-मुंडे उपस्थित होत्या. कार्यक्रमास कृषी संचालक विनयकुमार आवटे, वनराईचे विश्वस्त सागर धारिया, गिरीश गांधी, बाएफ संस्थेचे कृषी जैवविविधता तज्ज्ञ संजय पाटील, विनायक वैद्य खडीवाले, तसेच प्रयोगशील शेतकरी आणि कृषी अधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध पिकांच्या देशी जातींचे प्रदर्शनही भरविण्यात आले. जाधव यांनी सांगितले, की शासकीय सेवेत ग्रामीण भागात कार्यरत असताना राज्यभरातील प्रयोगशील शेतकऱ्यांनी जतन केलेल्या विविध देशी बियाण्यांची आणि पारंपरिक शेती पद्धतींची माहिती संकलित करण्यात आली. ही माहिती 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांसमोर आणली आहे. पुस्तकात भाताच्या विविध जाती, पारंपरिक पीक व्यवस्थापन, सेंद्रिय खतांचा वापर आणि अन्नधान्यांतील पोषणमूल्यांची माहिती देण्यात आली आहे. पाटील म्हणाले, की विविध राज्यांमध्ये पोषणमूल्य, चव आणि सुगंधासाठी प्रसिद्ध अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण भात जाती आहेत. काळाच्या ओघात त्यापैकी अनेक जाती नष्ट झाल्या. मात्र बाएफ संस्थेने लोकसहभागातून भातासह कडधान्ये, तृणधान्ये आणि भाजीपाला पिकांच्या नामशेष होत चाललेल्या जातींचे संवर्धन केले आहे. परंपरागत शेती ज्ञानाला विज्ञानाची जोड दिल्यास देशी जातींचे संवर्धन आणि बीजोत्पादन अधिक प्रभावीपणे करता येऊ शकते. त्यामुळे पोषणमूल्ययुक्त जाती ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. आवटे म्हणाले, की कृषी विभागाच्या विविध योजनांद्वारे शेतकरी गट, महिला बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना देशी बियाण्यांचे बीजोत्पादन, प्रक्रिया आणि विपणनासाठी मदत केली जात आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वनराईचे सचिव अमित वाडेकर यांनी केले.

# डाळिंब फळ तडकणे : कारणे आणि उपाय योजना

महाराष्ट्रात कमी पाण्यात कोरडवाहू क्षेत्रात वरदान ठरलेल्या डाळिंब पिकामध्येबऱ्याच प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये मररोग, तेलकट डाग रोग, फळे तडकणे, उत्पादित आयुष्य कमी मिळणे, इत्यादी डाळिंब बागेचे नियोजन करताना जमिनीची योग्य निवड केल्यास व माती परीक्षणामुळे संतुलित खतांचा वापर आणि बागेत स्वच्छता ठेवल्यास बागेची उत्पादित आयुष्य वाढवता येते.

पक्व होणाऱ्या डाळिंबफळांवर तेलकट चट्टे आणि फळे तडकण्याची विकृती मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहे. साधारणपणे १५ ते २० टक्के नुकसान फळे तडकल्याने होते. तडकलेली फळे जरी गोड असली तरी ती साठवून ठेवता येत नाहीत. आणि उशिरा विक्रीस ती अयोग्य ठरतात. फळे भेगाळल्याने त्यांच्या वजनात आणि रसाच्या प्रमाणात घट होते.

फळे तडकण्याची कारणे :फळ तडकने हे केवळ एकाच कारणामुळे न होता त्यास अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्यामध्ये चुकीचे पाणी व्यवस्थापन,जमिनीतील निवड, हवामानातील बदल, तेलकट डाग रोगाचा प्रादुर्भाव इत्यादी. अतिशय हलक्या जमिनीत नांगरणीच्या तासात रोपांची लागवड. जमिनीत मुक्त चुनखडीचे प्रमाण१२ टक्के पेक्षा जास्त असणे. जमिनीमध्ये नत्र, स्फुरद या मुख्य अन्नद्रव्य बरोबर कॅल्शियम, मॅग्नेशियम या दुय्यम अन्नद्रव्याची कमतरता तसेच बोरॉनया सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असणे. हवेतील तापमान वआद्रतेतविशेषत: रात्र व दिवसातील होणारी तापमानात तफावत. अवर्षणासारखी



परिस्थिती जास्त कालावधीसाठी राहिल्यास फळांची सालकडकहोते. अशा परिस्थितीत एकाएकी पाऊस झाल्यास किंवा भरपूर पाणी दिल्यास फळांच्या तडकण्याच्या प्रमाणात वाढ होते.

उपाय योजना :डाळिंबासाठी मध्यम, निचऱ्याची जमीन निवडावी, रोपांची लागवड ही २ बाय २ बाय २ फूट खोलीचे खड्डे घेऊन त्यामध्ये माती +२ घमेले कुजलेले शेणखत +१/२ किलो सुपर फास्फेट + ५० ग्रॅम फोरेट यांचे मिश्रण करून खड्डे भरून रोपांची लागवड करावी. माती परीक्षणासाठी प्रतिनिधिक स्वरूपाचा खड्डा घेऊन प्रत्येक एक फूटातील मातीचा पहिला थर, दुसरा थर आणि तिसऱ्या फुटातमाती असल्यास तिसरा थर अशा थराप्रमाणे माती घेऊन त्याची प्रयोगशाळेत तपासणी करून घ्यावी. माती परीक्षण अहवालामुळे सामू हा ६.५ ते ८.० पर्यंत असावा. विद्युत वाहकता (क्षारता ) ही ५० डेसी सायमन प्रति मीटर पेक्षा कमी असावे तसेच मुक्त चुनखडीचे प्रमाण सर्व थरात बारा टक्के पेक्षा कमी असावे. माती परीक्षणावरून डाळिंबास शिफारस केल्याप्रमाणे पूर्ण वाढलेल्या झाडास शेणखत चार ते पाच घमेले तसेच ६२५ ग्रॅम नत्र, २५० ग्रॅमस्फुरद आणि २५० ग्रॅम पालाश प्रति वर्ष प्रति झाडास ताण संपल्यानंतर पहिले पाणी देण्यापूर्वी द्यावे. उर्वरित नत्राची मात्रा दोन समान हप्त्यांत विभागून द्यावे.पहिली मात्रा ताण संपल्यानंतर बेसल डोस च्या वेळी व उर्वरित मात्रा बहारानंतर ४५ दिवसांनी आळे पद्धतीने द्यावी. जमिनीतील मुक्त चुनखडीचे प्रमाण पाच टक्के पेक्षा कमी असल्यास स्फुरद हे सिंगल सुपर फॉस्फेटद्वारे द्यावे म्हणजे या खताद्वारे स्फुरदा व्यतिरिक्त कॅल्शियमचा पुरवठा झाडांना होतो. तसेच मॅग्नेशियम सल्फेट चा वापर प्रति झाड २५ ग्रॅम प्रमाणे करावा. सूक्ष्म अन्नद्रव्ये उदा. जास्त लोह किंवा बोरॉनची कमतरता असल्यास सूक्ष्म अन्नद्रव्य स्लरीद्वारे उदा. एकरी २०० लिटर पाण्यामध्ये २५ किलो ताजे शेण + ५ लिटर गोमूत्र + ५ किलो फेरस सल्फेट + ५किलो झिंक सल्फेट + २ किलो बोरिक एसिड एकत्र आठवडाभर मुरवून सातव्या दिवशी झाडांना स्लरी द्यावी. फुले येण्यापूर्वी व ५० टक्के फुले असताना झाडावर फुले मायक्रो ग्रेड या द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेडची फवारणी करावी. बागेत आच्छादनाचा वापर केल्यास तापमान वआद्रतेवर वर नियंत्रण राहील. जमिनीच्या पोतानुसार पाण्याचे नियोजन करावे. शक्यतो ठिबक सिंचनाद्वारे विद्राव्य खतांचा वापर करावा. व पाण्याचा नियंत्रित वापर करावा. डाळिंबास जास्त पाण्याचा वापर करू नये. काळ्या जमिनीत निचऱ्याची व्यवस्था करावी.

अशा प्रकारे वरील दिलेल्या सूचनांचा डाळिंब उत्पादित आयुष्य वाढविण्यासाठी व फळे तडकण्यापासून बचाव करण्यासाठी उपाय योजना करावी. कारण याद्वारे पंधरा ते वीस टक्के डाळिंब फळाचे नुकसान टाळता येते.




## महत्वाच्या घटना

१५०५ : मुघल सम्राट हुमायू यांनी आपला पुत्र अकबर यांना आपला वारीसदार म्हणून घोषित केलं.
१६३३ : गॅलेलिओ गॅलिली याने पोपच्या दबावाखाली पृथ्वी हाच सूर्यमालेचा केंद्रबिंदू आहे असे कबूल केले.
१७५७ : प्लासीची लढाई सुरू झाली.
१८९७ : चार्ल्स रँड याला दामोदर हरी चाफेकर यांनी पुण्यातील जुलमाचा वचपा म्हणून बंदुकीने गोळ्या घातल्या.
१९०८ : 'देशाचे दुर्दैव' हा जहाल अग्रलेख लिहिल्याबद्दल लोकमान्य टिळकांना ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा
१९३१ : फ़र्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वासुदेव बळवंत गोगटे यांनी सर जॉन हॉटसन या मुंबई प्रांताच्या राज्यपालावर गोळया झाडल्या. हॉटसन वाचला. पुढे हे 'हॉटसन' गोगटे पुण्याचे महापौर बनले.
१९३९ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षापासून अलिप्त होऊन स्वता:च्या फॉरवर्ड ब्लॉक या राजनीतिक पक्षाची स्थापना केली.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्सने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४० : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेसमधुन बाहेर पडुन ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली.
१९४१ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सावरकर सदन येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट घेतली.
१९९३ : वेषभूषाकार भानू अथैय्या यांना अमेरिकेतील ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट ॲंड सायन्स या संघटनेचे सदस्यत्त्व देण्यात आले. या सदस्यांना प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्काराबाबत मत देण्याचा अधिकार आहे.
१९९४ : महाराष्ट्र सरकारचे महिलाविषयक धोरण जाहीर झाले. त्याद्वारे सरकारी व निमसरकारी नोकर्यात महिलांना ३० टक्के आरक्षण.
२००१ : जागतिक जलतरण स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा मातब्बर जलतरणपटू इयान थॉर्प याने आपला पहिला विश्वविक्रम केला. त्याने ४०० मीटर फ्रीस्टाईल शर्यत ३ मिनिटे ४०.१७ सेकंद अशा विक्रमी वेळात जिंकली.
२००७ : अंतराळवीर सुनिता विल्यम यांनी सुमारे १९४ दिवस १८ तास पूर्ण करून सर्वाधिक काळ अंतराळात राहून पृथ्वीवर परत आले.
२०१६ : भारतीय अंतराळ संस्था इस्रो ने जागतिक विश्वविक्रम रचत आपल्या देशाच्या उपग्रहासह विदेशातील एकूण २० उपग्रह प्रक्षेपित करण्याचा विक्रम रचला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०५: इटालियन स्वातंत्र्यवीर जोसेफ मॅझिनी यांचा जन्म. (मृत्यू: १० मार्च १८७२)
१८९६ : बाबुराव पेंढारकर, मराठी चित्रपट अभिनेता.
१८८७ : ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ ज्यूलियन हक्सले यांचा जन्म. (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७५)
१८९६ : नटश्रेष्ठ बाबुराव पेंढारकर यांचा जन्म.
१८९८ : पं. विनायकराव पटवर्धन शास्त्रीय गायक (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७५)
१८९९ : मास्किंग टेप चे शोधक रिचर्ड गिर्ली ड्र्यू यांचा जन्म. (मृत्यू: १४ डिसेंबर १९८०)
१९०० : भारतीय स्वातंत्र्य सेनानी व राजकारणी गणेश घोष यांचा जन्मदिन.
१९०८ : महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते यांचा जन्म. (मृत्यू: ९ एप्रिल १९९८)
१९२३ : मुकेश चंद माथूर तथा 'मुकेश' पार्श्वगायक. तीस वर्षांच्या फिल्मी कारकिर्दीत त्यांनी १०,००० हून अधिक गीतांना आवाज दिला. ऊर्दू, पंजाबी, तमिळ, बंगाली, मराठी, गुजराथी या भाषांतही त्यांनी गाणी गायली. अनुनासिक स्वर आणि गायकीत ओतप्रोत भरलेलाअ 'दर्द' ही त्यांच्या गायनशैलीची वैशिष्ट्ये होती. (मृत्यू: २७ ऑगस्ट १९७६)
१९२७ : भारतीय-इंग्लिश इतिहासकार आणि शैक्षणिक एन्थोनी लो यांचा जन्म. (मृत्यू: १२ फेब्रुवारी २०१५)
१९३२ : आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त केलेले चित्रपट व रंगमंच कलाकार अमरीश पुरी यांचा जन्म. (मृत्यू: १२ जानेवारी २००५ मुंबई, महाराष्ट्र)
१९३७ : वसंत रांजणे मध्यमगती गोलंदाज (मृत्यू: २२ डिसेंबर २०११)
१९८० : कीर्ती चक्र व सेना पदक सन्मानित माजी भारतीय गोरखा रेजिमेंटम अधिकारी सुनील कुमार चौधरी यांचा जन्मदिन.
१९८५ : भारतीय बास्केटबॉल संघाच्या माजी कर्णधार व बास्केटबॉल खेळाडू अनिता पॉलदुराई यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२७६ : पोप इनोसंट पाचवा.
१४२९ : गियात अल काशी, पर्शियन अंतराळतज्ञ व गणितज्ञ.
१९१८ : इन्दर लाल रॉय पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट (जन्म: २ डिसेंबर १८९८)
१९४० : ब्लाडिमार पी. कोपेन, रशियन हवामानशास्त्रज्ञ.
१९५५ : लेगस्पिनर व गुगली गोलंदाज सदाशिव ऊर्फ सदू शिंदे यांचे निधन. (जन्म: १८ ऑगस्ट १९२३)
१९८४ : गजानन लक्ष्मण तथा ग. ल. ठोकळ साहित्यिक व प्रकाशक (जन्म:१९०९)
१९८५ : थोर भारतीय स्वतंत्र सेनानी व समाजसुधारक आणि राजकीय कार्यकर्ता तसचं, आर्य समाज व आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचे अनुयायी मोहरसिंग राठोड यांचे निधन.
१९८८ : भारतीय बौद्ध भिक्षू, अभ्यासक, प्रवासी व लेखक भदंत आनंद कौसल्यायन यांचे निधन.
१९९३ : चित्रपट अभिनेते विष्णूपंत जोग यांचे निधन.
१९९४ : चित्रपट निर्माते व दिग्दर्शक अक्किनेरी लक्ष्मीवर प्रसाद राव ऊर्फ एल. व्ही. प्रसाद यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९०८)
१९९५ : हेरॉल्ड लारवूड इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १४ नोव्हेंबर १९०४)
२००० : हिंदी भाषिक लेखक व कवी केदारनाथ अग्रवाल यांचे निधन.
२००१ : डॉ. अरुण घोष, अर्थतज्ञ.
२००३ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १८ जून १९६५)
२००३ : कुसय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १७ मे १९६६)
२०१२ : रोमन कॅथोलिक चर्चचे भारतीय धर्मगुरू गिल्बर्ट ब्लेझ रेगो यांचे निधन.
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता रामा नारायणन यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १९४९)

# प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्वाच्या जोरावर नावलौकिक मिळवणाऱ्या व्यक्ती समाजासाठी प्रेरणास्थान-आ. सुरेश धस

## आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद : महापौर ज्योती गाडे

अहिल्यानगर । प्रतिनिधी

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सत्कारमूर्तींच्या कार्याचा आदर्श समाजाने घ्यावा, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. ते आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अहिल्यानगर येथे मेघनंद हॉटेल मध्ये दि २० जून रोजी आयोजित 'महाराष्ट्र आयकॉन्स' पुरस्कार सोहळ्यात ते अध्यक्षस्थानी भाषणात बोलत होते. पुढे बोलताना आ धस यांनी सांगितले की, प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्वाच्या जोरावर नावलौकिक मिळवणाऱ्या व्यक्ती समाजासाठी प्रेरणास्थान ठरतात. त्यांच्या कार्यातून तरुणांनी प्रेरणा घेऊन आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवत कार्य करणे आवश्यक आहे. आजच्या धावपळीच्या युगात वेळेचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले असून, प्रत्येकाने आपल्या कार्यात वेळेचे बंधन पाळणे गरजेचे आहे. ''आज कोणालाही कोणासाठी थांबायला वेळ नाही,'' असेही त्यांनी नमूद केले.तर आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने गेल्या सात वर्षांपासून सातत्याने नारी सन्मान व आज महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्कार विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तुत्वानचा गौरव केला हे युवा पत्रकार संघाचे मोठे कार्य आहे असे त्यांनी सांगितले.




आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने राज्यस्तरीय स्तरावर विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना एकत्र आणून त्यांचा सन्मान करण्याचा घेतलेला उपक्रम अत्यंत स्तुत्य असून समाजाला दिशा देणारा आहे, असे गौरवोद्गार अहिल्यानगर शहराच्या महापौर ज्योती गाडे यांनी व्यक्त केले.या पुरस्कार सोहळ्यामुळे समाजातील गुणी व्यक्तींना योग्य व्यासपीठ मिळत असून त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळत आहे, असे ही त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ सुधा कांकरिया,हभप महंत काशिनाथ महाराज शास्त्री, शिवसेनेच्या महिला जिल्हाध्यक्षा ॲड स्वाती जाधव, नगरसेवक सुरेश बनसोडे, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे,बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष लालाभाऊ कुमकर,हभप अशोक भोसले,हभप समाधान महाराज, संपादक राजेंद्र होळकर,जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे, उत्तम बोडखे, सुर्यकांत वडकर, संदिप खरमाळे आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळा यशस्वी करण्यासाठी या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, समीर शेख,सोपान पगारे, अतुल जवणे, प्रेम पवळ, निसार शेख, राजेंद्र लाड, अमोल जगताप, मारुती सत्रे, अतुल जाधव, किरण शिनगिरे, ओंकार कदम, अशोक कुताळ आदी पत्रकार यांनी परिश्रम घेतले.तर प्रास्ताविक अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले तर आभार प्रदर्शन समीर शेख यांनी मानले यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

---

# २५ जूनपासून जालन्यातील रेल्वे ब्रिजवरून दीड महिना 'नो एंट्री'

### उड्डाणपुलावर प्रशासनाकडून एक्स्पान्शन जॉइंट दुरुस्ती



जालना। प्रतिनिधी

शहरातील अंबड चौफुली ते मंठा चौफुलीदरम्यानच्या रेल्वे उड्डाणपुलावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची, दिलासादायक बातमी समोर आली आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने येत्या २५ जूनपासून या पुलावरील एक्स्पान्शन जॉइंट दुरुस्तीचे नियोजन आखले आहे. २५ जून ते १५ ऑगस्टपर्यंत हे काम चालणार असल्यामुळे तब्बल ५२ दिवस वाहनचालकांना पर्यायी रस्त्याचा वापर करावा लागणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून डे-बाय-डे प्लान मागवला असून त्यानंतरच वाहतूक वळवण्याची परवानगी देण्यात येईल, असे सांगितले आहे. त्यामुळे आठवडाभरात ही प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होते की जालनेकरांना पुन्हा जीवघेण्या खड्ड्यातूनच प्रवास करावा लागतो, याकडे वाहनधारकांचे लक्ष लागून आहे.

या रेल्वे पुलाची उभारणी १९९४ मध्ये करण्यात आलेली आहे. गत दोन-तीन वर्षांत या पुलावर पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक अपघात झालेले आहेत. मूळ जॉइंट्स निखळलेले असतानाही रेल्वे पुलावरील एक्स्पान्शन जॉइंट दुरुस्तीसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्याची परवानगी मागितली आहे. पर्यायी मार्गाने वाहने वळवल्यास दुपटीहून अधिक वेळ जाईल, प्रवाशांचा इंधन खर्चही वाढू शकतो. त्यामुळे साधारणत: ४० दिवसांत हे काम व्हायला हवे, तसा दैनंदिन प्लॅन द्या, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. त्यानंतरच वाहतूक वळवण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. तत्पूर्वी जाहीर प्रगटन प्रसिद्ध करावे लागेल. शशिकांत हदगल, अपर जिल्हा दंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जालना. अंबड चौफुलीमार्गे मंठा चौफुलीकडे ये-जा करणाऱ्या वाहनांना शहरातील नूतन वसाहत, रेल्वे स्टेशन रोड, मंमादेवी मंदिर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामार्गे ये-जा करावी लागेल. तर छत्रपती संभाजीनगरमार्गे येणाऱ्या वाहनांसाठी बारवाले महाविद्यालयाजवळील चौफुली, राजूर चौफुली, कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्हैयानगर चौफुलीहून बायपास मार्गे मंठा, नाव्हा ये-जा करता येईल. घनसावंगीला ये-जा करणाऱ्यांनासुद्धा शहरातील अंतर्गत रस्त्यांचाच वापर करावा लागेल. जड वाहनांबाबत अधिक काळजी घ्यावी लागणार असून याचे नियोजन केले जात आहे. आजवर केवळ डांबर टाकून प्रशासनाकडून तात्पुरती मलमपट्टी केली जात होती. मात्र, या मार्गावर होणारे सततचे अपघात व जीवघेणे खड्डे पाहता प्राधिकरण अखेर जागे झाले आहे. त्यामुळे एक्स्पान्शन जॉइंट दुरुस्तीला तब्बल ३२ वर्षांनंतर मुहूर्त मिळाला असून दुरुस्तीसाठी हा रस्ता पूर्णपणे बंद ठेवावा लागणार आहे. ऐन पावसाळ्यात मोठी गैरसोय होणार असल्यामुळे वाहतूक सुरक्षितपणे कशी वळवायची, याचे चोख नियोजन केले.

---

# मतदारसंघाचा विकास आणि निधीसाठी शिंदेंसोबत जातोय- नागेश पाटील

हिंगोली। प्रतिनिधी

शिवसेना ठाकरे गटातील ६ खासदारांच्या बंडखोरीच्या नाट्यानंतर, अखेर बंडखोर खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची पहिली अधिकृत प्रतिक्रिया समोर आली आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांवर पडदा टाकताना त्यांनी सोशल मीडियाद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली. ''मी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर मुळीच नाराज नाही,'' असे सांगत, त्यांनी बंडखोरी करण्यामागचे मुख्य कारण मतदारसंघाचा विकास आणि निधीची टंचाई हेच असल्याचे स्पष्ट केले आहे. आपल्या बंडखोरीबाबत बोलताना नागेश पाटील आष्टीकर म्हणाले, ''मी आज आपल्यासमोर दोन तीन दिवसांच्यानंतर पहिल्यांदा पोस्ट करत आहे. बऱ्याच दिवसांपासून वेगवेगळ्या चर्चांना उधाण येत आहे. प्रथमत: मी सांगू इच्छितो की, नाराज वैगेर होऊन गेलेलो नाहीये. उद्धव साहेबांवर मी मुळीच नाराज नाहीये. उद्धव साहेबांनी मला खूप प्रेम दिले, यात दुमत नाही. संजय राऊत किंवा मोठी मंडळी काही बोलत असतील, तर तो त्यांचा हक्क आहे. त्यांनीही माझ्यावर खूप प्रेम केले आहे. त्यामुळे ते बोलतात. काही अडचणीचे नाही. ते माझ्या वडिलांप्रमाणे आहेत. त्यामुळे ते बोलले तर मला वाईट वाटणार नाही.

बंडखोरीच्या वेळेबाबत खुलासा करताना नागेश पाटील आष्टीकर म्हणाले, ''१८ जूनपर्यंत आमच्यापैकी कोणीही कुठेही गेले नव्हते. मात्र, त्यानंतर पक्षाकडून ज्या पद्धतीने बोलण्याचा अतिरेक झाला, त्यामुळे आता तिथे थांबून काही फायदा नाही, असा विचार बऱ्याच सहकाऱ्यांनी केला आणि हे पाऊल उचलले. कृपया कुणीही असंवैधानिक बोलू नका, राग व्यक्त करा पण असंवैधानिकपणे बोलू नका, शब्द मनाला खूप लागतात. कारण, आपल्याच गावच्या बाभळी आणि आपल्याच गावच्या बोरी.'' सत्तेत सामील होण्याच्या निर्णयाचे समर्थन करताना नागेश पाटील यांनी मतदारसंघातील अडचणी मांडल्या. ते म्हणाले, ''सत्तेशिवाय कार्यकर्त्यांची आणि जनतेची कामे होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मतदारांनी मला खूप मोठ्या आशेने निवडून दिले आहे, त्यामुळे त्यांची कामे करणे हे माझे कर्तव्य आहे. आपल्याला विकासासाठी कुठलाही निधी मिळत नव्हता. केवळ खासदारांना मिळणारा ५ कोटींचा निधी गावोगावच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अतिशय अपुरा पडतो. प्रत्येक गावात गेल्यावर लोकांना विकासाची अपेक्षा असते. जर निधीच नसेल, तर मी लोकांची कामे कशी करू?'' आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करताना खासदार पाटील म्हणाले की, हे पाऊल कदाचित काहींना पटले असेल, तर काहींना पटले नसेल; शेवटी जनता जनार्दन आहे. ''निवडणुकीपूर्वी मी जनतेला म्हणालो होतो की, मला तुमच्या सेवेसाठी 'सालाने' ठेवा, मी तुमचे साल नेकीने पार पाडेन. मी गेल्या दोन वर्षांपासून निष्ठेने काम करत आलो आहे आणि पुढेही करत राहीन. मतदारसंघाचा विकास आणि निधी आणण्यासाठीच मला सत्तेत जाणे क्रमप्राप्त होते.

---

# शिवसेना वर्धापन दिन:शालेय साहित्य वाटप



जालना। प्रतिनिधी

शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जालना येथे शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा जिल्हा संघटक भानुदास घुगे यांच्या निवासस्थानी शिवसैनिकांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी पक्षाच्या विचारांचा प्रसार, संघटन मजबुती आणि जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या वेळी गरजू शालेय विद्यार्थ्यांना सोमवारपासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीनुसार ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण याप्रमाणे शिवसेनेच्या वतीने गरजू व गरीब शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार असल्याचे जिल्हा महिला आघाडीच्या रूपाली घुगे यांनी सांगितले. शहरप्रमुख दीपक रणनवरे म्हणाले की, शिवसैनिक नव्या जोमाने काम करत असून शिवसेना वाढवण्यासाठी आम्ही जिवाचे रान करणार आहोत, या वेळी शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी माजी नगरसेवक गणेश घुगे, राकेश घुगे, संदीप झारखंडे, अल्पसंख्याक शहरप्रमुख वसीम शेख, विजयकुमार अग्रवाल, साळवे, व्यवहारे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

---

# विठ्ठल नामाचा गजर करीत दिव्यांग वारकऱ्यांची दिंडी हिंगोलीत दाखल

### ठिकठिकाणी स्वागत, २३ जुलै रोजी पंढरपूरला पोहोचणार

हिंगोली। प्रतिनिधी

दिव्यांग संघ वाशिम यांच्या वतीने आयोजित संत सूरदास महाराज दिव्यांग वारीला वाशिम येथून मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने प्रारंभ झाला असून विठ्ठल नामाचा गजर करीत निघालेल्या दिंडीचे हिंगोली जिल्हयातील गोरेगाव येथे शनिवारी ता. २० स्वागत करण्यात आले. या दिंडीचे यावर्षी दुसरे वर्ष असून भक्तीभावामध्ये शारीरिक व्यंग आड येत नाही हे या दिव्यांग भाविकांनी दाखवून दिले आहे.

आषाढीवारी निमित्त देशभरातून वारकरी पंढरपूरला जातात. गोवागावातून जाणाऱ्या दिंड्या, पालखी सोहळे यामुळे वातावरण धार्मिक होते. या दिंडी सोहळ्यामध्ये मागील वर्षापासून सुरु झालेल्या संत सूरदास दिव्यांग वारीने अवघ्या राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. मागील वर्षी पहिल्यांदाच सुरू झालेल्या या दिंडीला भाविकांकडून आणि समाजातील सर्व स्तरातून भरभरून प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे यंदा दुसऱ्या वर्षीही अधिक आत्मविश्वासाने आणि श्रद्धेने दिव्यांग बांधव पंढरीच्या वाटेवर निघाले आहेत. टाळ-मृदंगाच्या निनादात वाशिम येथून निघालेल्या या दिंडीचे मार्गावरील गावागावांत नागरिकांकडून जंगी स्वागत केले जात आहे. दिव्यांग वारकऱ्यांची जिद्द आणि भक्ती पाहून अनेकांचे डोळे पाणावत आहेत. या दिंडीत प्रवीण कठाळे,



बालाजी तपासकर, फकीरा भालेराव, पंजाब जामकर, युवराज गेडाम, विनायक मस्के, अर्चना मस्के, सोमनाथ अफुने, दुर्गा अफुने, निलेश उईके, वेंकट आळे, गुड्डू अंबुडारे, अंकित कोसरे, अलका कठाळे, लक्ष्मी पाणबुडे, पुष्पाबाई भालेराव, यमुनाबाई जामकर, इंदुबाई तायडे, श्रीराम भालेराव आणि सदानंद तायडे या दिव्यांग भाविकांचा सहभाग आहे. या दिंडीचे गोरेगाव येथे स्वागत करण्यात आले आहे. अपंगत्व हे भक्तीच्या आड येऊ शकत नाही, हा संदेश देत ही दिंडी आषाढी एकादशीला पंढरपूरला पोहोचून विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेणार आहे. दिव्यांगांची दिंडी म्हणून नावलौकिक मिळविलेल्या या वारीने समाजासमोर इच्छाशक्ती, जिद्द आणि भक्तीचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

---

# मागण्या मान्य न झाल्यास राज्यभर उद्रेक होईल

## सरकारच्या बुडाखाली आग लावणारे आंदोलन असेल, रविकांत तुपकरांचा सरकारला इशारा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

''माझे पाच दिवसांचे अन्नत्याग आंदोलन कोणत्याही आमदारकी किंवा खासदारकीच्या स्वार्थासाठी नव्हते, तर राज्यातील पिचलेल्या बळीराजाला न्याय मिळवून देण्यासाठी होते. मंत्री गिरीश महाजन यांच्या शब्दाला मान देऊन आणि मुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक बैठकीच्या आश्वासनानंतर मी उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे. मात्र, सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचा किंवा आम्हाला गृहित धरण्याचा प्रयत्न केला, तर गावागावांतील शेतकरी हातात गोफण घेऊन रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही,'' असा थेट आणि आक्रमक इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला आहे. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सरसकट शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी बुलढाणा येथे पाच दिवस अन्नत्याग आंदोलन केले. गिरीश महाराज यांच्या मध्यस्थीनंतर तुपकरांनी आपले उपोषण स्थगित केले. सलग पाच दिवस अन्नत्याग आंदोलन केल्यामुळे रविकांत तुपकर



यांची प्रकृती खालावली असून, सध्या त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रुग्णालयातूनच त्यांनी माध्यमांशी संवाद साधत आपली पुढील आक्रमक भूमिका स्पष्ट केली.

आपल्या आंदोलनामागील भूमिका स्पष्ट करताना तुपकर म्हणाले की, ''मी पाच दिवस अन्नत्याग आंदोलन केले होते. आमदारकी किंवा खासदारकी मिळवण्यासाठी ते आंदोलन केले नाही. माझा त्यात व्यक्तिगत स्वार्थ काही नव्हता. महाराष्ट्रातील शेतकरी सरसकट मुक्त झाला पाहिजे. २०२४ आणि २०२५ चा शेतकऱ्यांचा हक्काचा पीकविमा त्यांना १०० टक्के मिळायला पाहिजे. विमा कंपन्यांनी जो घोळ घातला, त्याचे ऑडिट केले पाहिजे. शेतकऱ्यांना डीएबी अन्? युरियाचे खत मिळत नाहीये, त्याचे दरही वाढलेले आहेत. ते दर कमी झाले पाहिजेत, खत उपलब्ध झाले पाहिजे, यांसह अने मागण्या घेऊन मी अन्नत्याग आंदोलन केले.'' रविकांत तुपकर म्हणाले, ''सुरुवातीला सरकारने आंदोलनाकडे दुर्लक्ष केले. मात्र, नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री गिरीश महाजन यांना पाठवले. महाजनांनी आमच्यासोबत चर्चा केली. आमचे म्हणणे ऐकून घेतले. पाच-सहा दिवसांत सरकारसोबत बैठक लावतो आणि सकारात्मक तोडगा काढू, असा शब्द गिरीश महाजन यांनी दिला. त्यांच्या विनंतीला मान देऊन आपण उपोषण स्थगित केले. उपोषणामुळे माझी तब्येत खालावली असून, मी सध्या छत्रपती संभाजीनगर येथील एका रुग्णालयात उपचार घेत आहे. सरकारसोबत झालेल्या बैठकीत जर सकारात्मक निर्णय झाला नाही किंवा आमच्या मनासारखे शेतकऱ्यांना काही मिळाले नाही, तर महाराष्ट्र शेतकऱ्यांने पुन्हा आंदोलन नव्या दमाने आणि नव्या ताकदीने उभे करणार आहोत,'' असा इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला आहे. '' यावेळी अन्नत्याग करणार नाही, पण शेतकरी रस्त्यावर उतरेल. सरकारच्या बुडाखाली आग लावणारे, भुतोनभविष्यतील असे ते आंदोलन असेल. शेतकऱ्यांची ताकद काय असते? हे आम्ही त्या आंदोलनातून सरकारला दाखवून देऊ. आमच्याशी गद्दारी करण्याचा किंवा आम्हाल गृहित धरण्याचा प्रयत्न जर सरकारने केला, तर गाववाड्यातील हातात गोफण घेऊन रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही,'' असा इशारा रविकांत तुपकर यांनी राज्य सरकारला दिला आहे.

---

# ढेकणमोहच्या पसायदान संस्थेत वृक्षारोपण, अन्नदान



बीड। प्रतिनिधी

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांचा वतीने विविध सामाजिक उपक्रम साजरे करण्यात आले. ढेकणमोह येथील पसायदान सेवा प्रकल्पात वृक्षारोपण करून अन्नदान करण्यात आले.

युवासेनेचे मराठवाडा संपर्क प्रमुख बाजीराव चव्हाण यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांनी आरोग्य सेवेत व्यापक कार्य सुरु आहे. पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोह जि.बीड येथे वृक्षारोपण करून पर्यावरण जागृतीचा संदेश दिला तर या सेवा प्रकल्पात निवासी असलेल्या अनाथ मुलांना अन्नदान करण्यात आले. जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजासमोर आदर्श निर्माण केला. यावेळी रुग्णसेवक शरद झोडगे, कपिल जोगदंड, फुलचंद नेवाळे, हरिदास कदम, शिवराज उगले, ज्ञानेश्वर साळुंके, हरिदास करांडे, अभिषेक साळुंखे, नारायण सपकाळ आदींची उपस्थिती होती. आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो. आपल्या भोवती असलेल्या उपेक्षित समाजाला खऱ्या अर्थाने आधाराची गरज आहे. अनाथ मुलांच्या साक्षीने वाढदिवस साजरा केला, हा माझ्यासाठी मोठा क्षण आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
सोमवार दि.२२ जून २०२६


# देवस्थान जमीन हस्तातरण कायद्यावर पुन्हा हालचाली सुरु हरकतीशिवाय निर्णय नको, देवस्थानांकडून सावध भूमिका

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाकडून प्रस्तावित देवस्थान जमीन कायद्याबाबत नव्याने हरकती आणि सूचना मागविण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध देवस्थाने, सेवेकरी आणि धार्मिक संस्थांमध्ये पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले आहे. यापूर्वी मोठ्या प्रमाणावर हरकती प्राप्त झाल्यानंतर मागे घेण्यात आलेल्या मसुद्याच्याच धर्तीवर नव्याने कायदा आणण्याचा प्रयत्न होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात असून, या प्रक्रियेत देवस्थानांच्या हिताचे खरे प्रतिनिधित्व होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

देवस्थानांच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे की, प्रस्तावित कायद्यासाठी नियुक्त होणाऱ्या समित्यांमध्ये अशा व्यक्तींचा समावेश होऊ नये ज्यांनी पूर्वी किंवा सध्या देवस्थानांच्या जमिनींवर, उत्पन्नावर, मानधनावर, विरासत हक्कांवर किंवा मालमत्तेवर वैयक्तिक दावे केलेले आहेत. कारण अशा व्यक्ती संपूर्ण राज्यातील देवस्थानांच्या हिताचा विचार करण्याऐवजी स्वतःच्या किंवा विशिष्ट गटाच्या हिताच्या तरतुदी मसुद्यात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करू शकतात.

धार्मिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, देवस्थानांच्या जमिनी या मूळतः पूजा-अर्चा, दिवाबत्ती, नैवेद्य, उत्सव आणि धार्मिक सेवांच्या सातत्यासाठी देण्यात आलेल्या आहेत. खिदमत-माश, मदद-माश आणि इतर स्वरूपातील या जमिनी कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक संपत्तीसाठी नव्हत्या. त्यामुळे अशा जमिनींच्या भवितव्याबाबत निर्णय घेताना केवळ महसुली दृष्टिकोन न ठेवता धार्मिक, ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, विरासत प्रमाणपत्र, मुतवलीपद किंवा सेवेकरी म्हणून नाव नोंदले असल्याने संबंधित व्यक्तीला देवस्थानाच्या मालमत्तेवर मालकी हक्क प्राप्त होत नाही, असा मुद्दाही अनेक

पान ३ वर

निपक्षपाती विश्वस्त यांचा समावेश असावा देवस्थानांच्या जमिनींचे संरक्षण हेच समितीचे पहिले कर्तव्य असावे प्रस्तावित कायदा लागू करण्यापूर्वी शासनाने स्पष्ट सांगितले पाहिजे की देवस्थानांच्या जमिनी, उत्पन्न आणि धार्मिक परंपरांचे संरक्षण कसे होणार आहे. समितीमध्ये अशा व्यक्ती असाव्यात ज्यांचा कोणताही वैयक्तिक हितसंबंध नाही. देवस्थानांच्या जमिनींवर हिस्सा, मानधन किंवा मालकी हक्क मागणाऱ्या व्यक्तींना समितीत स्थान देणे योग्य ठरणार नाही.निपक्षपाती विश्वस्त यांचा समावेश असावा

–रामनाथ खोड, अध्यक्ष श्री क्षेत्र शनी मंदिर देवस्थान बीड

देवस्थान भूमिहीन होणार नाहीत याची हमी द्यावी

अनेक देवस्थाने आजही त्यांच्या जमिनींच्या उत्पन्नावर पूजा-अर्चा, दिवाबत्ती आणि उत्सव चालवतात. नवीन कायद्यामुळे भविष्यात देवस्थाने स्वतःच्या जमिनींपासून वंचित राहणार नाहीत याची स्पष्ट हमी शासनाने द्यावी.

–डॉ.गणेश ढवळे, सामाजिक कार्यकर्ते




## जुन्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला ;लोखंडी कत्ती-रॉडने मारहाण

परळी । प्रतिनिधी

परळी शहरात जुन्या वादातून एका तरुणावर लोखंडी कत्ती आणि रॉडने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपी ताब्यात आहेत, तर उर्वरित आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

परळी वैजनाथ शहरात जुन्या वादातून एका तरुणावर लोखंडी कत्ती आणि रॉडने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शहरातील राजगड हॉटेल अँड बिअर बार रोड परिसरात भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. उर्वरित आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

दि. २० जून २०२६ रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या दरम्यान परळीतील राजगड हॉटेल अँड बिअर बार रोड परिसरात ही घटना घडली. फिर्यादी पवन संगमेश्वर फुटके (वय ३३, रा. शास्त्रीनगर, परळी वैजनाथ) हे परिसरातून जात असताना आरोपींनी त्यांना अडवले.

जुन्या वादाच्या कारणावरून आरोपींनी संगनमत करून पवन फुटके यांच्याशी वाद घातला. सुरुवातीला शिवीगाळ करत त्यांना चापटांनी मारहाण करण्यात आली. मात्र काही क्षणांतच हा वाद हिंसक वळणावर गेला.

लोखंडी कत्ती आणि रॉडने हल्ला

फिर्यादीला गंभीर इजा पोहोचवून जीवे मारण्याच्या उद्देशाने आरोपींनी लोखंडी कत्ती आणि लोखंडी रॉडचा वापर करत हल्ला केल्याचा आरोप आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला.घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी आणि स्थानिकांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपींनी मध्यस्थी करणाऱ्यांनाही शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करणाऱ्या महसूल अधिकाऱ्याला अडवून धमकी

माजलगाव । प्रतिनिधी

अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करत असताना महसूल विभागाच्या अधिकाऱ्याला अडवून शिवीगाळ, धक्काबुक्की करत शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यात आल्याची घटना दि १९ जुन रोजी घडली असुन याप्रकरणी महसूल कर्मचाऱ्यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि. १९ जून रोजी दुपारी सुमारे २:०० वाजण्याच्या सुमारास हिवरा-गव्हाणथडी रोडवरील सावरगाव

**माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल**

परिसरात महसूल विभागाकडून अवैध वाळू वाहतुकी विरोधात कारवाई सुरू होती. यावेळी विनापरवाना वाळूची वाहतूक करणारा टिप्पर ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीसाठी तहसील कार्यालय, माजलगाव येथे आणतांना आरोपी विश्वंभर पवार (रा. केसापुरी,ता. माजलगाव) याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल (एमएच-४४-एल-९२८९) आडवी लावून वाहन अडवले.त्यानंतर महसूल अधिकारी रामेश्वर नारायण थापडे यांना खाली उतरवून शिवीगाळ व धक्काबुक्की केली.तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.या प्रकरणी विश्वंभर पवार व परमेश्वर बाबासाहेब पाटेकर रा.गव्हाणथडी,ता. माजलगाव) यांच्याविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १३२, ३०३(२), ११५(२), ३५२, ३५१(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्याची नोंद १९ जून रोजी पहाटे ४.२२ वाजता करण्यात आली असून पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलिस करीत आहेत.

## भरधाव थारने उडवलेल्या जखमी प्रशांत देशमुख यांचा मृत्यू; थारचालक फरार

परळी । प्रतिनिधी

परळी शहरात थार या चारचाकी वाहनाने दुचाकीस्वाराला मागून जोरदार धडक दिल्याचा सीसीटीव्ही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या प्रशांत प्रल्हाद देशमुख (रा. परळी) यांचा उपचारादरम्यान रविवारी (दि. २१) मृत्यू झाला. त्यांच्या निधनामुळे परळी शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत देशमुख हे संत भगवानबाबा चौक ते तहसील कार्यालय मार्गावरून दुचाकीने जात असताना भरधाव थार वाहनाने त्यांना मागून जोरदार धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली.दरम्यान, अपघातानंतर थार चालक घटनास्थळावरून पसार झाल्याचे सांगितले जात आहे. देशमुख कुटुंबीयांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शहरात हा केवळ अपघात नसून नियोजित किंवा जीवघेणा हल्ला असू शकतो, यामुळेच धार चालक घटनास्थळी यापासून पसार झाल्याचे देखील चर्चा रंगली होती. मात्र याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. पोलिस विविध अंगांनी तपास करत असून धडक नेमकी कशामुळे देण्यात आली, चालक कोण होता आणि घटनेमागील कारण काय होते, याचा शोध घेत आहेत. मागील काही महिन्यांपासून शांत असलेले परळी शहर या घटनेमुळे पुन्हा चर्चेत आले आहे. प्रशांत देशमुख यांच्या मृत्यूमुळे परिसरात शोककळा पसरली असून आरोपी चालकाला तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.थारच्या धडकेमागील सत्य काय? हा अपघात होता की जाणीवपूर्वक केलेला हल्ला? याचे उत्तर आता पोलिस तपासातूनच समोर येणार आहे.

## माजलगाव येथे ७२ वर्षीय राधाकिसन उफाडे यांना अमानुष मारहाण

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील रहिवासी आणि मातंग समाजाचे ज्येष्ठ नागरिक राधाकिसन उफाडे (वय ७२ वर्षे, मूळ गाव: नागडगाव, ता. माजलगाव, जि. बीड) यांना पैशाचा खोटा आरोप ठेवून, जुन्या वादातून काही समाजकंटकांनी रिक्षामध्ये टाकून पळवून नेल्याची आणि त्यांना अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या गंभीर घटनेनंतर उफाडे हे गेल्या दोन दिवसांपासून बीड येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन-तीन दिवसांपूर्वी माजलगाव येथून काही समाजकंटकांनी वृद्ध राधाकिसन उफाडे यांना जुन्या वादाचा राग मनात धरून आणि पैशाचा खोटा आळ आणून बळजबरीने रिक्षात टाकून पळवून नेले. त्यानंतर त्यांना बेदम व अमानुष मारहाण करण्यात आली. या मारहाणीत ते गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी तातडीने माजलगाव येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते.

दोन दिवस पोलीस फिरकलेच नाहीत; सामाजिक कार्यकर्त्यांच्या

पान ३ वर





## पालिका पोट निवडणुकीत भाजपचा मोठा विजय : राष्ट्रवादीला अपयश

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगर परिषदेच्या पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे दोन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला आहे. रविवारी ता. २१ रोजी सकाळी अकरा वाजता निकाल जाहीर करण्यात आला. भारतीय जनता पक्षाचे विजयी उमेदवार राहुल जिजा खंडागळे यांना ५९१ मताचे मताधिक्य मिळाले तर सायेमा आकेफ काझी यांचा ५२१ मतांनी विजय झाला आहे. मुस्लिम बहुल भागात कमळ फुलले असून, विजयी उमेदवारांनी मतदारांचे आभार मानले आहेत.





पोटनिवडणूकीचा निकाल जाहीर होताच, भाजपाच्या कार्यकर्त्यांनी शास्त्री चौकात ढोल ताशांच्या ठेक्यावर ताल धरला. फटाक्यांची अतषबाजी करून, गुलालांची उधळण करून आनंदोत्सव साजरा केला आहे.-गेवराई नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक अकरा च्या पोटनिवडणुकी साठी शनिवार ता. २० रोजी झाले होते. २२८६ स्त्री - पुरूष मतदारांपैकी १७४६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. रविवार ता. २१ रोजी सकाळी दहा वाजता मतमोजणीस सुरूवात झाली. निवडणूक निर्णय अधिकारी संजय सोनवणे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम मांडुरके यांनी निकाल जाहीर करून, भारतीय जनता पक्षाचे दोन्ही उमेदवार निवडून आल्याचे घोषित करण्यात आले.एकाच वार्डाची पोटनिवडणूक असल्याने भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी जोरदार प्रचार केला. कॉर्नर सभा, मतदारांच्या भेटीगाठी, पदयात्रा काढून प्रचारात रंग भरला होता. निवडणूक

## शरीरासोबतच मन स्वाथ्यासाठी योग हे उत्तम साधन -ना. पंकजाताई मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

योगा हे एकमेव साधन ज्याने शरीरासह मन आणि आत्मा आपण सुदृढ करू शकतो, शरीराला जसा व्यायाम आवश्यक आहे, तसाच मनाला देखील व्यायामाची गरज आहे आणि त्यासाठी योग हे उत्तम माध्यम आहे, त्याला आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनवा असं आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पवई येथे महिलांसमवेत योगाभ्यास करून ना. पंकजाताईंनी आज आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला.

पवई (मुंबई) येथील निसर्ग उद्यान रामबाग येथे भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा, मुंबईच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिवस निमित्त महिलांसाठी विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी मार्गदर्शक करताना त्या बोलत होत्या. मुंबई भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा



श्रीमती योजना ठोकळे यावेळी उपस्थित होत्या. आपल्या शरीराला शास्त्रीय पद्धतीने सशक्त करण्याचे आणि निरोगी आरोग्य राखण्याचे योग हे महत्वपूर्ण साधन आहे. योगाचा नियमित अभ्यास करा असं त्या म्हणाल्या.

माता-पित्याच्या नावाने वृक्षारोपण करा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक पेड माँ के नाम' चा संदेश दिला आहे, त्यात मी एक लेक म्हणून 'एक पेड पिता के नाम' असा संकल्प जोडला आहे. कारण या दोघांचाही यात सन्मान असणार आहे. एक आपल्याला जन्म देणारी माता आणि दुसरा आपला जीवनदाता असा दोघांचाही सन्मान म्हणून वृक्षारोपण करा असा संदेश देत ना.पंकजाताईंनी याप्रसंगी वृक्षारोपण केले. यावेळी योगाभ्यास साठी महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## व्यायाम प्राणायाम योगासने करणे फार गरजेचे-आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मानसाने आपल्या शरीराला कीमान दररोजचे ४५ मिनिटे तरी द्यावी या या पृथ्वी तलावावर सर्व काही पैशाने विकत घेता येते मात्र एक अशी निरोगी शरीर विकत घेता येत नाही त्यामुळे व्यायाम प्राणायाम योगासने करणे फार गरजेचे झाले आहे शरीर संपत्ती फार महत्वाची आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी आंतरराष्ट्रीय योग दीना निमित्त ते बोलत होते अनिषा ग्लोबल स्कूल, आष्टी भारतीय जनता पार्टी, आष्टी यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अनिषा ग्लोबल स्कूल, आष्टी येथे आयोजित योग दिन कार्यक्रमास उपस्थित राहत योगसाधनेत सहभागी झालो.

योग मार्गदर्शक प्रा.श्री.योगेश्वर सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमात



विद्यार्थी, विद्यार्थिनी, व्यापारी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच शहर व परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून निरोगी शरीर, प्रसन्न मन आणि संतुलित जीवनशैलीचा पाया आहे. यावेळी उपस्थित सर्वांशी संवाद साधून आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## तरुणांनी शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी दैनंदिन जीवनात योगाचा अवलंब करावा -जिल्हाधिकारी जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

केवळ योग दिनानिमित्त एक दिवस योग न करता, प्रत्येकाने दररोज योगासने केली पाहिजेत. नवीन येणाऱ्या पिढीला, विद्यार्थ्यांना तसेच तरुणांना योगाच्या माध्यमातून आपले शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवता येते, हा संदेश देणे आज गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्या वतीने रविवार दि. २१ जून २०२६ रोजी सकाळी ६:३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे सामूहिक योग व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या मुख्य मार्गदर्शक पदावरून



जिल्हाधिकारी जॉन्सन बोलत होते. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्यासह जिल्ह्यातील विविध प्रशासकीय यंत्रणांचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित या सामूहिक योग उपक्रमात बीड जिल्ह्यातील विविध शासकीय विभाग, विविध शैक्षणिक संस्था, स्थानिक क्रीडा संघटना, विविध योग संस्थांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थितांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार विविध योगासने आणि प्राणायामाची प्रात्यक्षिके केली.

संयुक्त राष्ट्र महासभेने वर्ष २०१४ मध्ये २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून घोषित केला. तेव्हापासून दरवर्षी जगभरात हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. योगाचे महत्त्व अगदी तळागाळातील जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे आणि समाजाला निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे, हाच या भव्य उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचेही यावेळी सांगितले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26